# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा इतिवृत्त

**दिनांक ०१-०३-१९९३ ते २१-०४-१९९३**

## रजिष्टर क्र. १५

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १-३-१९९३ रोजी दुपारी ३=३० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. सोमवार दिनांक १-३-९३ रोजी दुपारी ३=३० वाजता समिती सभागृहात मा.सभापती ॲड.श्री.इगबालसिंग गिल यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.**

**या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१) मा.श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
२) मा.श्री. भगुरे तुळशीराम छगन
३) मा.श्री. अलिम बेग मिर्झा कलीम बेग
४) मा.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
५) मा.श्री. विजय गोविंदलाल पालीवाल
६) मा.श्री. जावेद हसनखान कासीम हसनखान
७) मा.श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
८) मा.श्री. पेरकर विठठ्ल कोंडाजी
९) मा.श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव

**विषय क्र.५०३/१ :**

दिनांक १३-१-९३ व २२-१-९३ व ३०-१-९३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती व विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.गिरजाराम हाळनोर :** गेल्या आठवडयापासून एका सायंकाळ दैनिकात सारखे चार दिवस झाले जकात बाबत चर्चा चालू आहे.त्याबाबत प्रशासनातर्फे काहीही खुलासा झाला नाही. तसेच गेल्या सभेस जकात अधिक्षकांनी आजारी कारणास्तव रजा घेतली होती.आज सभा असुन देखील जकात अधिक्षक सभेस आले नाहीत.रजेवर आहेत काय? जर रजेवर आहेत रजा आहेत काय,की त्यांचे सहाय्यक आले आहेतकाय,दैनिकातील बातम्या बाबत पुढच्या सभेत खुलासा केला नाही याचा अर्थ हया बातम्या खऱ्या आहेत काय.

**उप-आयुक्त :** याबाबत पुढच्या सभेत खुलासा करण्यात येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर,श्री.मधुकरराव शिंदे,श्री.नारायण फत्तेलष्कर :** पुढच्या सभेत सविस्तर माहिति पुरवावी नसता सभा होवू देणार नाही. तसेच जकात अधिक्षक यांनी सभेस हजर रहावे.

**श्री.मधुकर शिंदे :** मालमत्ता विभागात इमारत निरीक्षक बऱ्याच वर्षापासून त्याच विभागात आहेत त्यांची बदली कधी होणार.

**सहाय्यक आयुक्त :** ३० मार्च पर्यंत बदल्या करण्यात येणार आहेत.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** उन्हाळा तोंडावर आला आहे. जायकवाडी धरणाचे पाणी बरेच खाली गेले आहे त्यासाठी पाण्याची व्यवस्था काय केली आहे. पुर्वतयारी काय केली.

**कार्यकारी अभियंता :** दहा (१०) हाप्से खोदण्याचे टेंडर मागविले आहेत.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** टँकर किती चालू आहेत.बंद किती व पाणी पुरवठा कसा करणार खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता :** शहरात पाच टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहेत.

**श्री.तुळशीराम भगुरे :** हर्सुल येथे जे मनपाने म्हाडातर्फे घरे बांधुन दिले आहे. परंतू तेथे जाण्यासाठी रस्ता तयार करुन दिले नाहीत. ते कधी तयार करुन देणार.

**अतिरिक्त शहर अभियंता :** घराचे अंतर्गत मुरुम शेड तयार केले आहेत व डांबरीकरण महानगरपालिकातर्फे करुन देणार आहोत.

**श्री.मधुकर शिंदे :** २५ तारखेपासून अक्रिमण हाटवून संबंधित लोकांना गारखेडा येथे मनपाचे जागेवर जागा दिली आहे त्यांना पाण्याची व्यवस्था केलेली नाही.

**कार्यकारी अभियंता :** टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** विद्युत विभागामध्ये साहित्य भांडारामध्ये नाहीत अशी ओरड चालु आहे.विद्युत विभागाचे अधिकारी हजर नाहीत. माझ्या वॉर्डात १५ ते २० लाईट बंद आहेत.

**अतिरिक्त शहर अभियंता :** ते रजेवर आहे. भांडारामध्ये साहित्य आहे.टयुब लाईट मागविण्यात आले आहे,तरी लाईट लावण्यात येतील.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** संत एकनाथ नाटय गृहामध्ये जनरेटर खरेदी करण्यात आले आहे तर त्याची माहीती पुरविण्यात यावी.

**अतिरिक्त शहर अभियंता :** पुढच्या सभेमध्ये माहीती पुरविण्यात येईल.

**मा.सभापती :** विषय क्र. ४३९/५ मधील वाढीव अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते व नविन दरपत्रक न मागविता पुर्वीच्याच गुत्तेदारांकडून काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**श्री.मधुकर शिंदे :** श्री.रघुनाथ जाधव यांनी मनपाचे निवासस्थान मिळावे म्हणून अर्ज दिला आहे त्यांना आज पावेतो घर देण्यात आलेले नाही.

**मालमत्ता अधिकारी :** नक्षत्रवाडी किंवा कांचनवाडी येथील क्वार्टर रिकामे असतील तर देण्यात येईल.

**श्री.मधुकर शिंदे :** क्रांतीनगर रोडवर मनपानी ज्या जागा भाडयानी दिल्या आहेत तेथे पोट भाडेकरु पगडी घेवून ठेवले आत आहेत तरी त्यावर मनपाने काय कार्यवाही केली आहे.

**मालमत्ता अधिकारी :** तशा लोकांना नोटीसा दिल्या आहेत त्यावर लवकरच सुनावणी करण्यात येईल.

**मा.सभापती :** गार्डनमधील खेळण्याचे साहित्य खरेदीसाठी किती बजेट शिल्लक आहे.याचा खुलासा व्हावा.

**शहर अभियंता :** सहा लाख रक्कम शिल्लक आहे.

**ठराव :**

दिनांक १३-१-९३ व २२-१-९३ व ३०-१-९३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती व विशेष स्थायी समितीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०४/२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,बहादुरपूरा येथे १५० व १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयाची आहे.त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची

दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रु. १,६४,६००/- एवढयाचे तयार करण्यात आलेले आहे.सदर कामाचा खर्च हा भांडवली कामासाठी करण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बहादुरपूरा येथे १५० व १०० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहीनी टाकावयासाठी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,६४,६००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५०५/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.शहाबाजार येथील समाज मंदिराचे वाढीव आणि स्तुप बांधणेच्या कामासाठी सा.बां.खात्याचे सन ९२-९३ चे डी एल आर दराने रक्कम रु.२,२५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा खर्च इमारती व उर्वरीत कामे या शिर्षकामधुन करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.शहाबाजार येथील समाज मंदिराचे वाढीव बांधकाम करण्यासाठी वाढीव अंदाजपत्रक रक्कम रु. २,२५,०००/-च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.५०६/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मजनुहील येथे दक्षिणेकडील बाजूने कंपाऊंडवॉल उर्वरित भाग बांधणे बाबत कामासाठी सा.बां. खात्याचे सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १,६६,०५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.सदर काम शासकीय अनुदाना अंतर्गत मंजुर आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी "बी-१" या नमुन्यात निविदा सुचना ९२-९३ पत्र क्र.७९२ दि.४-१२-९२ द्वारे मागविण्याकरीता शहरातील दै.मराठवाडा,दै.सकाळ,दैनिक ओरंगाबाद टाईम्स इ.वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले.त्या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा एकूण २७ विक्री करण्यात आले व स्विकारण्याच्या अंतिम तारखेस निविदा दर भरुन सिलबंद पाकीटात एकूण १२ प्राप्त झाले.त्यात दिलेले दराचे तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सी | दिलेले दर | |
|---|---|---|---|
| १) | व्ही.पी. | २२% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २) | बी.आर आनंद | २१.२१ % | --//-- |
| ३) | स.रफिकोद्दीन | १६.७० % | --//-- |
| ४) | व्ही.के.चौधरी | १५.०९ % | --//-- |
| ५) | सुखबिरसिंग | १५ % | --//-- |
| ६) | आर.अे.शेख | १४.८६ % | --//-- |
| ७) | सय्यद सिराजोद्दीन | १३.७५ % | --//-- |
| ८) | आनंद बिल्डर्स | ११.३ % | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ९) | एस.एच.असोशिएटस | ११ % | --//-- |
| १०) | एस.आर.सनपुरकर | १० % | --//-- |
| ११) | एम.बी.कळसे | १० % | --//-- |
| १२) | किशोर शेलार | ९.६८ % | --//-- |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२ % कमी दराचे श्री.व्ही.पी.फुलंब्रीकर गुत्तेदार यांचे आहे. दरास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मजनूहील येथे दक्षिणेकडील बाजूने कंपाऊंडवॉल उर्वरीत भाग बांधणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२ % कमी दराच्या गुत्तेदार श्री.व्ही.पी.फुलंब्रीकर यांचे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०७/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ज्योतीनगर ते साईट क्र.१२० पर्यंतच्या ५० डी.पी.रोडच्या खडी रस्त्याचे काम करणेसाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु. १,५०,८७०/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "शासकीय अनुदान इ.स.१९९२-९३ च्या सदरातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी निविदा सुचना क्र.मनपा / बां.२ / ५८७६ / ९२ दिनांक २८/१२/९२ द्वारे दै.लोकविजय,दै.मुफस्सीर व दै.औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहीरात देवून प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित वेळेला एकूण तीनच निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.एम.जी.महेबुब अली | अंदाजपत्रकीय दराने | |
| २) श्री.एम.आर.बेग | ५.५ % | जास्त दराने |
| ३) श्री.आर.डी.नाफी | १०.१ % | जास्त दराने |

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराने श्री.एस.जी.महेबुब यांची निविदा असून मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.ज्योतीनगर ते साईट क्र.१२० पर्यंतच्या ५० डी.पी. रोडच्या खडी रस्त्याचे काम करणेसाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने गुत्तेदार श्री.एम.जी.महेबूब यांचे निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०८/६ :**

मालमत्ता अधिकारी मनपा औरंगाबाद मा.आयुक्त यांचे मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहे की,या अधिचा स्थायी समितीचा ठराव क्र. ८/५ दिनांक २३-६-९२ अन्वये कार्यालयाने खालील शॉपिंग सेंटर मधील दुकानाचे सुधारीत भाडे दर दिनांक १-७-९२ पासून लागू केले आहेत.

१) शहागंज शॉपिंग सेंटर

२) निजामोद्दीनदर्गा शॉपिंग सेंटर
३) जाफरगेट शॉपिंग सेंटर
४) पिरबाजार शॉपिंग सेंटर
५) रेल्वेस्टेशन शॉपिंग सेंटर
६) सब्जीमंडी शॉपिंग सेंटर
७) औरंगपूरा शॉपिंग सेंटर

या ठरावान्वये लागू केलेले सुधारीत भाडे दर कार्यालयाचे शहर अभियंता यांनी मुल्यांकीत केल्यानुसार कायम करण्यात आलेले आहेत. सुधारीत भाडे दराने भाडे भरणा करण्या संबंधीत भाडे करुने नोटीसेस दिल्या असता वाढीव भाडे आकारणी विरोधात भाडेकरुंनी हरकत अर्ज दाखल केलेले आहेत. दि. १-७-९२ पुर्वच्या भाडयात या भाडेवाडीमुळे अनेक पटीने वाढ झालेली आहे.याबाबत भाडेकरुनी हरकत घेतलेली आहे. केलेली भाडेवाढ वादग्रस्त होवून त्यामुळे भाडे वसुलीचे काम दिर्घकाळ स्थगित होण्याची शक्यता आहे व त्यामुळे कार्यालयाचे नियमित उत्पन्नात खंड पडू नये या कारणाने केलेल्या भाडेवाढीबाबत फेरविचार करण्याची आवश्यकता विचारात घेवून शहागंज शॉपिंग सेंटर मधील भाडेकरुचे प्रतिनिधीशी मा.आयुक्त यांनी दिनांक २५-१-९३ रोजी तडजोड केलेली आहे. या शॉपिंग सेंटर मधील ज्या दुकानाचे भाडे दिनांक १-७-९२ पुर्व ७९/- द.म.होते ते रु. १२५/- द.म.करण्याचे तडजोड अंती ठरले आहे. म्हणजे जुन्या भाडयात ५८.२२ % वाढ तडजोडीमुळे होईल. भाडेवाढीच्या याच टक्केवारीने शहागंज शॉपिंग सेंटरमधील सर्वच दुकानाचे भाडयात वाढ करण्याचे तडजोडीचे वेळी ठरले आहे.

२) शहागंज शॉपिंग सेंटर व्यतिरिक्त इतर ६ शॉपिंग सेंटर मधील भाडेकरुशी परिस्थितीनुरुप भाडेवाढीस तडजोड करावी लागणार आहे.

वर उल्लेखीत ठरावान्वये केलेली भाडेवाढ वादग्रस्त ठरली आहे.दिनांक १-७-९२ पासून या शॉपिंग सेंटरमधील भाडेकरुनी सुधारीत दराने भाडे भरणा बंद केला आहे.त्यादृष्टीने तडजोड करणे आवश्यक झाले आहे.

करीता प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सुधारीत भाडे वाढी बाबतचा या आधीचा स्थायी समितीचा ठराव क्र. ८/५ दिनांक २३-६-९२ अन्वयेची अंमलबजावणी रद्द करुन वरील परिच्छेद क्र.१ मध्ये नमूद केलेल्या शहागंज शॉपिंग सेंटरच्या भाडेवाढ तडजोडीस मान्यता मिळणेस्तव व इतर ६ शॉपिंग सेंटर मधील भाडेकरुशी भाडेवाढीबाबत मा.आयुक्त परिस्थितीनुरुप जी तडजोड करतील तशी तडजोड स्थायी समितीस मान्य राहील अशा अर्थाचा ठराव पारित करणे बाबत विचार होणेस्तव सादर.

**संवाद :**

**मालमत्ता अधिकारी :** वसुलीत अडचण येवू नये म्हणून त्वरीत समितीची मिटींग बोलावून भाडयाचा वाद मिटवावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्व शॉपिंग सेंटर धारकांना १० मार्च पर्यंत सब कमेटी निर्माण करुन सुनावणीसाठी बोलवावे. सदर समितीत एक प्रशासनाचा सदरचा व चार स्थायी समिती सदस्य ठेवावे. या सोक्त सुपरमार्केट च्या निविदाधारकांनी बोलवावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.५०९/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चौथ्या तिमाहीसाठी सिमेंट खरेदी बाबत पुर्वीचे पुरवठाधारक व्ही.एल.ट्रेनिंग कंपनी यांना या कार्यालयाचे पत्रक क्र. २६/९३ दिनांक २४-१-९२ द्वारे मा.आयुक्त साहेब यांच्या दालनात सिमेंट पुरवठयाच्या दराबाबत

दिनांक २९-१-९३ रोजी वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले होते व त्या आधारे संबंधीत सिमेंट पुरवठाधारक याने पत्र देवून कळविले की,सिमेंट दर वाढत आहेत तरी प्रत्यक्ष मा.आयुक्त साहेब यांच्या दालनात सिमेंटच्या दराबाबत वाटाघाटी ठरल्याप्रमाणे मागील दरापेक्षा रुपये १० % प्रति मेट्रीक टन कमी करण्यास तयार आहे म्हणजे पुर्वीच्या दर प्रतिटन रुपये २०३० आहे तर आता रुपये २०३० प्रति मेट्रीक टन दर्शविला आहे.

वित्तीय वर्षाचे अखेरचे दोन महिने शिल्लक आहे व मनपाचे काम व काही कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने सिमेंटची अत्यंत आवश्यकता आहे. तरी व्ही.ए.ट्रेनिंग कंपनीकडून प्रति मे.टन रुपये २०३०/- या दराने १५००/- मे.टन सिमेंट पुर्वीच्या अटीप्रमाणे खरेदीस व रुपये ३०,३०,०००/- तीस लाख तीस हजार यास मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मे.व्ही.ए.ट्रेनिंग कंपनी कडून १५०० मे.टन सिमेंट प्रति टन रुपये २०३०/- या दराने रुपये ३०,३०,०००/- चे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१०/८ :**

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळातर्फे केल्या जाणाऱ्या ठोक पाणी पुरवठयाची बिले महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणे बाबत शासन निर्णय क्रमांक एम.आय.एस-१०९२ /प्र.क्र./१२२ / नवि-२८,मंत्रालय,मुंबई दिनांक ६ नोव्हेंबर १९९२ अन्वये आदेशीत करण्यात आली आहेत.त्यानुसार दिनांक १३-१२-९२ रोजी मा.आयुक्त महानगरपालिका यांच्या दालनात पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाकडील नक्षत्रवाडी ते क्रांतीचौक पर्यंत सर्व पाणी पुरवठा व्यवस्था व विजेचे मिटर महानगरपालिकेने ताब्यात घेण्यासंबंधीची बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीस महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाचे अधिकारी व महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते. शासन निर्णयानुसार बैठकीस खालील मुद्दे ठरविण्यात आले.

१) सध्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी होणाऱ्या विज पुरवठयाची बिले एप्रिल १९९३ पासुन पुढे महानगरपालिकेने भरावीत. त्यापुर्वी विज कनेक्शन मिटर महानगरपालिकेचे नावाने हस्तांतरण करण्यात येईल.
२) सध्याच्या महानगरपालिकेसाठी असलेल्या रुपये २-०५ असा पाणी दर महानगरपालिकेने विजेची बिले भरल्यास सामान्यपणे रुपये १-०० एवढा येईल.
३) परिसर अभियांत्रिकी मंडळाकडून सध्याचे विजबिल रुपये ५० लाख भरण्यात येते.पैकी महानगरपालिकेच्या वाटयास घेतलेल्या पाण्याचे प्रमाणात या बिलाची विभागणी केल्यास ती साधारणत: ८५ % म्हणजे रुपये ४२=०० लाख इतकी येईल. थोडक्यात विज बील रुपये ४२ =५० व रुपये १/- दराने पाणी यांचे बील सामान्यपणे रुपये १७=०० लाख असे एकूण रुपये ५९=०० लाख (रुपये ६०=०० लाख) एवढी देयक दयावी लागतील.यामध्ये ५ % सुट देण्याचे शासनाचे आदेशीत अभिप्रेत आहे. ही सुट लक्षात घेता (६०-३) ७५% =५७ लाख रुपये देयक द्यावे लागेल.

यानुसार महानगरपालिकेला रुपये ५७=९० लाख इतके पाणी व विद्युत बिले यापुढे भरावे लागेल.सध्या महानगरपालिका ३५=०० लाख इतके पाणी व विज बिल भरत आहे. म्हणजेच यापुढे १ एप्रिल ९३ पासुन रुपये २२=०० लाख इतका दरमहा जास्त खर्चाचा बोजा महानगरपालिकेवर पडणार आहे. थोडक्यात वर्षाला सामान्यपणे २२x१२=२ कोटी ६४ लाख

इतका अतिरिक्त भार त्यामुळे मनपावर पडणार आहे. ही बाब लक्षात घेवून सन १९९३-९४ च्या अंदाजपत्रकात त्याप्रमाणे तरतुद करावी लागेल.

तरी पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाकडील नक्षत्रवाडी ते क्रांतीचौक पर्यंत सर्व पाणी पुरवठा व विजेचे मिटर महानगरपालिकेने ताब्यात घेण्याविषयीचा धोरणात्मक प्रस्ताव मंजुरीस्तव तसेच प्रतिमहा अतिरिक्त वाढणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री.अजीजुल्ला बेग :** दुसऱ्या प्राधिकरणासोबत मा.आयुक्तांना करार करण्याचा अधिकार आहे काय.

**मा.उप आयुक्त :** करार केला नाही फक्त चर्चा झाली आहे.

**ठराव :**

शासनाच्या निर्णयाचे पत्रकासोबत पुढील सभेत ठेवावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.५११/९:**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन ९२-९३ सालात शाळेसाठी फर्निचर साहित्य खरेदी करण्याकरीता स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त निविदा धारकांनी दाखल केलेले फर्निचर साहित्य मा.शहर यांनी फर्निचर तपासून केलेल्या शिफारशीनुसार खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या साहित्याच्या दरास मान्यता होणे बाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | दर | निविदाधारकाचे नांव |
|---|---|---|---|
| १) | एस.टाईप चेअर | केनिंग बँक/पगा बँक | प्रभात इंजिनिअरिंग वर्क्स |
| २) | क्लासरुम टेबल ३x२ | ३९०/३.२५ ४७५/- | प्रभात इंजिनिअरिंग वर्क्स |
| ३) | ऑफिस टेबल ४x२ | १६५०/- | संतोष सेल्स कार्पोरेशन |
| ४) | फोल्डींग चेअर | १५०/- | संतोष सेल्य कार्पोरेशन |

वरीलप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या दरास मान्यतेबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागास रुपये १ लाख७५ हजाराचे फर्निचर खरेदीस शहर अभियंता यांनी तपासुन शिफारस केल्याप्रमाणे प्रस्तावातील दरास मंजुरी देण्यात येते.तसेच कामाची तातडी लक्षात घेता याच सभेत स्विकृतीही देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१२/१० :**

सहाय्यक आयुक्त-२ महानगरपालिका हे मा.महापौर निवास फर्निचर व इतर साहित्य खरेदी करण्याकरीता मागील स्थायी समिती ठराव क्र. ३५७ दि. १७-१०-९२ अन्वये रुपये चार लाखांची मंजुरी घेण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात सदरील साहित्य खरेदीसाठी रुपये ४,६१,२१२=०० एवढा खर्च येत आहे.करीता दि. ३०-१-९३ च्या स्थायी समितीत वाढीव रक्कम रुपये ६१,२१२=०० च्या रकमेस मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला होता व तो मंजुर करण्यात आलेला आहे.एकंदरीत रुपये ४,६१,२१२=०० च्या खर्चास मान्यता प्राप्त झालेली आहे.

मा.महापौर निवासासाठी लागणारे फर्निचर व इतर साहित्य खरेदी बाबत निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली असता खालीलप्रमाणे निविदा दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | साहित्य | एस.एन.प्रॉडक्टस | एम.एस.एस. आयडीसी | मेघदुत एजन्सी | आर.बी. इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोफासेट दोन खुर्ची स्टँडर्ड साईज(प्रतिनग) | १४,५००=००<br>५,०००=०० | ६,३३०=०० | ४,५००=००<br>६,२७०=००<br>९,७२०=००<br>११,१५०=०० | १४,५००=०० |
| २ | सोफासेट लेदर दोन खुर्चीसह स्टॅंडर्ड साईज(प्रतिनग) | १९,५००=००<br>६,७००=०० | ८,१७६=००<br>११,७६०=०० | ५,४५०=००<br>४,२५०=००<br>६,३००=००<br>५,९००=००<br>९,७५०=००<br>११,६५०=०० | ४५,०००=०० |
| ३ | दिवाण बॉक्स टाईप ३x६ सागवान (प्र.नग) | ३,०००=०० | २,३७५=०० | १,२७५=०० | ४,५००=०० |
| ४ | डायनिंग टेबल ८x४x२ १/२ सागवान | ९,०००=०० | ३,१४६=००<br>३,५६५=०० | ४,७००=०० | ११,७५०=०० |
| ५ | डायनिंग चेअर वुडन | १,५०००० | ३७२=००<br>५६४=०० | ४८५=००<br>७२०=०० | ८१०=०० |
| ६ | लाकडी स्टुल सागवान १x१x१ १/२ | २१०=०० | १६५=०० | ३७५=०० | ६४०=०० |
| ७ | डबलबेड५'x७'सागवान | ४,०००=०० | ४,०२५=०० | ४,४५०=०० | १५,५००=०० |
| ८ | डबलबेड कारबिन ५x७सागवान | २५,०००=०० | ५,२९०=०० | ७,८५०=०० | ३७,७५०=०० |
| ९ | स्टील रॅक ७२"x३६"x१८" | १,५००=०० | १,३१४=०० | ५९०=०० | ३,१००=०० |
| १० | टि.व्ही.शोकेस | ६,०००=०० | ३,१०५=०० | ५,२००=००<br>९५०=०० | ६,३००=०० |
| ११ | ड्रेसिंग टेबल सेट स्टूलसह | ४,०९०=०० | १,४९५=०० | ६,२५०=००<br>१,८००=०० | ६,७००=०० |
| १२ | वुडन सेअर सागवान सिटबॅक फोम | १,२५०=०० | ६३३=०० | ७००=०० | ३,४५०=०० |
| १३ | टेबल ४'x२'x२ १/२ एकाबाजुस तीन ड्रावर स्ट्रील फ्रेम | २,९५०=०० | १,६१०=०० | १,४२५=०० | ५,२५०=०० |
| १४ | टेबल ४'x२'x२ १/२साधे स्ट्रीफ्रेम | १,५००=०० | ६२४=०० | ६५०=०० | ३,९००=०० |
| १५ | पॅकटेबल १x१x१ | ३००=०० | १७३=०० | ५३०=०० | ३,८००=०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १/२ सागवान | | | | |
| १६ | ज्युटमॅटींग प्रस्केफुट | ५०=०० | -- | -- | १४=४५ |
| १७ | क्वायर मॅटींग | ५०=०० | -- | -- | १४=०० |
| १८ | नॉन ओवर कारपेट | ४४=०० | -- | -- | २८=०० |

वरीलप्रमाणे सर्व साहित्याची पाहणी मा.शहर अभियंता यांनी करुन पुढीलप्रमाणे साहित्य खरेदीस करण्या बाबत शिफारस केलेली आहे व दि. ३०-१-९३ रोजी झालेल्या खरेदी समितीत मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेल्या साहित्याच्या खरेदीस मान्यता दिलेली आहे.

| अ. क्र. | साहित्य क्र. | नग | दर | एकूण रक्कम | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ८ | १४,५००=०० | १,१६,०००=०० | मे.एस.एन.प्रॉडक्टस. |
| २ | २ | ३ | १९,५००=०० | ५८,५००=०० | मे.एस.एन.प्रॉडक्टस. |
| ३ | ३ | १ | ३,०००=०० | ३,०००=०० | मे.एस.एन.प्रॉडक्टस. |
| ४ | ४ | १ | ९,०००=०० | ९,०००=०० | मे.एस.एन.प्रॉडक्टस. |
| ५ | ५ | १० | १,५००=०० | १५,०००=०० | मे.एस.एन.प्रॉडक्टस. |
| ६ | ६ | ४ | १६५=०० | ६६०=०० | मे.एम.एस.आय.डी.सी |
| ७ | ७ | ३ | ४,०००=०० | १२,०००=०० | मे.एस.एन.प्रॉडक्टस. |
| ८ | ८ | १ | २५,०००=०० | २५,०००=०० | मे.एस.एन.प्रॉडक्टस. |
| ९ | ९ | १ | १,३१४=०० | १,३१४=०० | मे.एम.एस.आय.डी.सी |
| १० | १० | १ | ५,२००=०० | ५,२००=०० | मे.मेघदुत एजन्सीज. |
| ११ | ११ | ४ | ६,२५०=०० | २५,०००=०० | मे.मेघदुत एजन्सीज. |
| १२ | १२ | ३६ | १,२५०=०० | ४५,०००=०० | मे.एस.एन.प्रॉडक्टस. |
| १३ | १३ | ३ | २,९५०=०० | ८,८५०=०० | मे.एस.एन.प्रॉडक्टस. |
| १४ | १४ | ३ | १,५००=०० | ४,५००=०० | मे.एस.एन.प्रॉडक्टस. |
| १५ | १५ | ३ | ३००=०० | ९००=०० | मे.एस.एन.प्रॉडक्टस. |
| १६ | १६व १८१० स्क्वे.१७ फुट अंदाजीत | | ५०=०० | ९०,५००=०० | मे.एस.एन.प्रॉडक्टस. |
| १७ | १८ | ९२७ स्क्वे.फुट | ४४=०० | ४०,७८८=०० | मे.एस.एन.प्रॉडक्टस. |
| | | | एकूण | ४,६१,२१२=०० | |

वरीलप्रमाणे सर्व साहित्याची मा.शहर अभियंता यांचेकडून तपासणी करुन खरेदी समितीने शिफारस केल्यानुसार साहित्याच्या दरास मंजुरी बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.महापौर बंगल्यासाठी लागणाऱ्या फर्निचर खरेदीतील वाढीव रक्कम रु.६१,२१२=०० व एकंदर रक्कम रु.४,६१,२१२=०० रु.खर्चास आणि शहर अभियंता यांनी साहित्य तपासून मंजुरीची शिफारस केल्याप्रमाणे सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**-:ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र.५१३/११ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको विभागातील एन-७,एन-९,एन-११ व एन-१२ मधील काही सेक्टरमध्ये पुर्वीच्या लाईन बंद करुन घरासमोरुन १००,१५० व २०० मी.मी.व्यासाचे पाईप लाईन टाकण्याचे कामासाठी रुपये ११,४०,०००/- चे सन ९०-९१ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आले असून सदरच्या खर्च महाराष्ट्र शासन अनुदान सन १९९१-९२मधुन करण्यात येणार आहे.

सदरील कामासाठी दै.सिटीजन्स व दै.औरंगाबाद टाइम्स या वृत्तपत्रामधून जाहिर सूचना देवून निविदा मागविण्यात आल्या.त्याप्रमाणे एकूण ८(आठ) निविदा विक्री झालेल्या होत्या व त्या स्विकारणेच्या अखेरच्या दिनांक पावेतो फक्त दोनच निविदा प्राप्त झालेल्या असुन त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.आर.एस.धाडीवाल ४३.८% जास्त
२) श्री.जी.एस.कटारीया ६५% जास्त

तुलनात्मकदृष्टया वरील प्राप्त निविदेमध्ये कमी दराची निविदा श्री.आर.एस.धाडीवाल यांची म्हणजे सन १९९०-९१ च्या दरसुची पेक्षा ४३.०८ % व सन १९९१-९२च्या दरसुची पेक्षा ६.२८% जास्त दराची आहे.मा.आयुक्त यांनी दि.५-२-९३ रोजी दर कमी करण्यासाठी गुत्तेदारास वाटाघाटीसाठी बोलावून सन १९९०-९१ च्या अंदाजपत्रकाच्या ४०% जास्त दराने व सन काम करण्यास स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. तरी सदरील काम श्री.आर.एस.धाडीवाल यांची सन १९९१-९२ च्या दरापेक्षा ४% जास्त दराची निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको विभागातील एन-७,एन-९,एन-११ व एन-१२ मधील पुर्वीच्या लाईन बंद करुन घरासमोरुन १००,१५० व २०० मी.मी.व्यासाचे पाईप लाईन टाकण्याचे कामासाठी वाटाघाटीअंती ठरल्यानुसार श्री.आर.एस.धाडीवाल यांची सन १९९०-९१ च्या अंदाजपत्रकापेक्षा ४०%जास्त दराची व सन १९९१-९२ च्या दरापेक्षा ४% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१४/१२ :**

कार्यकारी अभियंता पा.पु.यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको, एन-१२,मधील सी.जी.एच.येथे १०० व २०० मी.मी.व्यासाची जलवाहीनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रुपये १०,३८,३४६/- चे तयार करण्यात आले असुन सदरील खर्च महाराष्ट्र शासन अनुदान सन १९९१-९२ मधुन करण्यात येणार आहे.

सदरील कामासाठी स्थानिक वृत्तपत्र सिटीजन व औरंगाबाद टाईम्स मध्ये जाहीर सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या असता एकूण (८) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम दिनांकास फक्त दोनच निविदा प्राप्त झालेल्या असुन त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.इ.म.सजनानी १३ % जास्त दराने
२) संजीव खर्डीकर ५ % जास्त दराने

तुलनात्मकदृष्टया वरील प्राप्त निविदा पैकी श्री.संजीव खर्डीकर यांची निविदा कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकापेक्षा ५ % जास्त दराची आहे. तसेच मा.आयुक्त यांनी सदरील गुत्तेदाराची दिनांक ३-२-९३ रोजी चर्चा करुन ४ % जास्त दराने काम करण्यास मान्यता

दिली आहे. तरी श्री.संजीव खर्डीकर यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ४ % जास्त दराने स्विकारण्याचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको, एन-१२ मधील सी.जी.एच.येथे १०० व २०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकण्याचे कामासाठी सदरील खर्च महाराष्ट्र शासन अनुदान सन १९९१-९२ मधुन करण्यात येत असुन सदरील कामाअंतर्गत गुत्तेदार श्रीसंजीव खर्डीकर यांचेशी दि.३-२-९३ ला मा.आयुक्त यांनी चर्चा केली असता सदरील दर अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१५/१३ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केली आहे की, सिडको भागातील जलवाहीनीच्या कामासाठी १००,१५०,२०० मी.मी.व्यासाचे स्लुस व्हॉल्व खरेदी करण्यासाठी रुपये ४,९७,०७२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदरील अंदाजपत्रकास स्थायी समितीचे ठराव क्र.३८०/१८ दि.९-११-९२ अन्वये मंजुरी मिळाली आहे.

सदील कामासाठी दै.लोकमत,दै.सिटीजन्स व दै.रहेबर या स्थानिक वृत्तपत्रातुन जाहिर सुचना दि.६-१२-९२ रोजी प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या असता एकूण कोऱ्या निविदा तीन विक्री करण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारणेच्या तारखे अखेर पर्यंत फक्त दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) बालाजी इंडस्ट्रीज | ७.२६ % | जास्त दराने |
| २) दुर्गा इंजिनिअरींग | १३.३७ % | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया वरील प्राप्त निविदा पैकी श्री.बालाजी इंडस्ट्रीज यांची निविदा कमी दराची म्हणजे ७.२६ % जास्त दराची आहे.

मा.आयुक्त यांनी दि.१-२-९३ रोजी आदेशान्वये सदरील पुरवठा धारकास वाटाघाटीसाठी मान्यता दिली आहे.

करीता श्री.बालाजी इंडस्ट्रीज यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा १ % कमी दराने मंजुर करण्याचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको भागातील जलवाहीनीच्या कामासाठी १००,१५०,२०० मी.मी.व्यासाचे स्लुस व्हॉव्ह खरेदी करण्यासाठी वाटाघाटीअंती ठरल्यानुसार श्री.बालाजी इंडस्ट्रीज यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा १ % कमी दराची स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१६/१४ :**

मा.कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की, शमा हॉटेल ते नागेश्वरवाडी पर्यंत (भाग-२) मोठी जलनिःसारण वाहीनी टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ३१,७०,०००=०० चे परिसर अभियांत्रिकीच्या सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असुन सन १९९२-९३ च्या प्राप्त सरकारी अनुदानातुन सदर काम करण्यास मा.आयुक्त महोदयांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र.२३ / ०२ /९३ दि. २-१-९३ नुसार दैनिक लोकमत व इंडियन एक्सप्रेस दैनिकात जाहीरात देवून बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविले असता एकूण सहा निविदा पत्रके विकण्यात आल्या होत्या.त्यापैकी चार निविदा पत्रके प्राप्त झाली असून त्याचा तुलनात्मक तक्ता दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.योग सिमेंट प्रो.अँड मे.कं. | १७% जास्त |
| २) | मे.जि.एम.कटारीया | ३१% जास्त |
| ३) | श्री.आर.एल.बारवाल | २१% जास्त |
| ४) | श्री.कुलवंतसिंग | २३% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७ % जास्त दराचे मेसर्स योग हसमेंट प्रोडक्टस मॅन्युफॅक्चर अँड कन्स्ट्रक्टींग कं.लि.यांचे दरपत्रक आहे.दरपत्रक जास्तीचे असल्याने मा.आयुक्त महोदयांच्या आदेशावरुन दर वाटाघाटी करणेस्तव कार्यालयात बोलावले असता वाटाघाटी होवून भरलेल्या दरातुन १% कमी करुन संबंधितास काम देणेस्तव मंजुरी देण्यात आली असुन संबंधित गुत्तेदार यांनी स्विकृती दिलेली आहे.

करीता १६ % जास्त दराचे मेसर्स योग सिमेंट प्रोडक्टस मॅन्युफॅक्चरींग अँड कन्स्ट्रक्टींग कंपनी लिमिटेड यांच्या दरपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रामा हॉटेल ते नागेश्वरवाडी पर्यंत (भाग-२) मोठी जलनि:सारण वाहीनी टाकणेच्या बाबतच्या कामासाठी सविस्तर वाटाघाटीअंती गुत्तेदार मेसर्स,योग सिमेंट प्रोडक्टस मॅन्युफॅक्चरींग अँड कंस्ट्रकटींग कं.लि.यांच्या १६% जास्त दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१७/१५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.१३ बारी कॉलनी पासुन ते रोषनगेट पर्यंत गटार बांधणे बाबत रक्कम रु.३१,२८,०००=०० चे सन १९९०-९१ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असुन सदर काम सन १९९२-९३ च्या शासकिय अनुदाना अंतर्गत करण्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशाप्रमाणे सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.२३ /०२ ९३ दिनांक २३-२-९३ ला दैनिक इंडियन एक्सप्रेस व लोकमत या वर्तमानपत्रात जाहीरात देवून तिसऱ्यांदा बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विकण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ दोन निविदा प्राप्त झालेल्या असुन त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.आर.एल.बारवाल ३५ % जास्त
२) मे.गोडविन कंन्स्ट्रक्शन २५ % जास्त

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५ % जास्त दराचे मेसर्स गोडविन कंन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रक आहे. परंतु सदर दर मा.आयुक्त यांना योग्य वाटत नसल्यामुळे संबंधितास पत्र देवून दर वाटाघाटी करीता पाचारण करण्यात आले. दिनांक १७-२-९३ ला मा.आयुक्त,मा.मुख्यलेखा परिक्षक व कार्यकारी अभियंता यांच्या समक्ष कामाची दर वाटाघाटी झाली. अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५ % जास्त दराऐवजी २४% जास्त दरास मा.अयुक्त यांनी मंजुरी दिली.

तुलनात्मक दृष्टया विचार करता सदरील अंदाजपत्रकीय दरापेक्षा (२४%जास्त) दर हा सन १९९१-९२ च्या दरसुची प्रमाणे सदरील दर हा ४.८७ % कमी येतो.करीता मेसर्स

गोडविन कन्स्ट्रक्शन यांचा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीचा दर आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१३ बारी कॉलनी पासुन ते रोषनगेट पर्यंत गटार बांधणेच्या कामासाठी सविस्तर वाटाघाटीअंती गुत्तेदार मेसर्स गोडविन कन्स्ट्रक्शन यांच्या २४ % जास्त दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१८/१६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.    रामा हॉटेल पासुन ते गोमटेश मार्केटपर्यंत मुख्य जलनिःसारण वाहीनी टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. २८,७१,०००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असुन सदर काम सन १९९२-९३ च्या शासकीय अनुदानातुन करण्यात येईल. तसेच मा.आयुक्त यांनी सदरील अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली आहे.

आदेशाप्रमाणे सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.२३ /०२/९३ दिनांक २-१-९३ ला दैनिक लोकमत व इंडियन एक्सप्रेस या वर्तमान पत्रात जाहीरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दहा निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी केवळ चा (४) निविदा प्राप्त झालेल्या असुन त्यांचा तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मेसर्स किर्ती कंस्ट्रक्शन | १६ % जास्त |
| २) | श्री.आर.एल.बारवाल | १२ % जास्त |
| ३) | श्री.जि.एम.कटारीया | १५.२० % जास्त |
| ४) | मेसर्स योग सिमेंट पाईप | २० % जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२ % जास्त दराचे श्री.आर.एल.बारवाल यांचे दरपत्रक आहे. परंतु मा.आयुक्त यांना सदर दर योग्य वाटत नसल्यामुळे संबंधित गुत्तेदार यांना दिनांक ९-२-९३ ला पत्र देवून दर वाटाघाटी करीता पाचारण करण्यात आले.दिनांक १७-२-९३ ला मा.आयुक्त,मा.मुख्यलेखा परिक्षक मा.कार्यकारी अभियंता यांच्या समक्ष दर वाटाघाटी करण्यात आली.अंदाजपत्रकीय १२% जास्त दराऐवजी १० % जास्त दराने काम करण्यास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिली.

करीता अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० % जास्त दराची श्री.आर.एल.बारवाल यांची निविदा आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रामा हॉटेल पासुन ते गोमटेश मार्केट पर्यंत मुख्य जलनिःसारण वाहीनी टाकणे बाबतच्या कामासाठी सविस्तर वाटाघाटीअंती गुत्तेदार श्री.आर.एल.बारवाल यांच्या १० % जास्त दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१९/१७ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मो.लेबर कॉलनी ते शहागंज रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९१-९२ च्या डी.एस.आर.नुसार अंदाजपत्रक रक्कम रु.४,९६,७६०/- चे बनविण्यात आले

असून मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.सदरील कामाचा खर्च १९९२-९३ च्या शासकीय अनुदानातुन करावयाचा आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १७ / जा.क्र.मनपा / बां-१ / ६५९ /९२ दि. ७-१-९३ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण पाच निविदा विकल्या गेल्या त्यापैकी एकूण दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्या दिनांक १-२-९३ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारा समक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.ए.सी.कोठारी | २१.५० % | जास्त |
| २) श्री.खाजा अमिनुद्दीन | १७.८६ % | जास्त |

वरीलपैकी श्री.खाजा अमिनुद्दीन यांच्या निविदाचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १७.८६ % जास्त दराची निविदा आहे.सदरील दर कमी करणे बाबत कळविले असता गुत्तेदाराने लेखी स्वरुपात कळविले आहे की,अंदाजपत्रक हे १९९१-९२ च्या डी.एस.आर.नुसार आहे.व सध्या १९९२-९३ च्या डी.एस.आर.नुसार तुलना केली असता १.३० % जास्तीचे दर येतात.तरी १७.८६ % जास्त दराची निविदा स्विकारणे योग्य.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.लेबर कॉलनी ते शहागंज रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १७.८६ % जास्त निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२०/१८ :**

मा.अतिरीक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, भावसिंगपुरा येथील स.नं.२६/१ जवळून जाणारा १०० डी.पी.रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.५,३१,३४०=०० चे बनविण्यात आले असुन मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९२-९३ च्या शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१७ / जा.क्र.मनपा / बां-१ /६५९/९३ दिनांक ७/१/९३ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण चार निविदा विकल्या गेल्या त्यापैकी एकूण दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक १-२-९३ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.अब्दुल सलाम | ०.०५ % | कमी |
| २) श्री.खाजा आमिनुद्दीन | ७.९० % | जास्त |

वरीलपैकी श्री.अब्दुल सलाम यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०५ % कमी दराची निविदा आहे.विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.भावसिंगपुरा येथील स.नं.२६/१ जवळून जाणारा १०० डी.पी.रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०५ % जास्त दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२१/१९ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, रोषनगेट ते मध्यवर्ती जकात नाक्या पर्यंतच्या ८०'डी.पी रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु.१६,०८,४००=००चे बनविण्यात आले असुन मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.सदरील कामाचा खर्च सन ९२-९३ च्या शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा क्र. १७/जा.क्र.मनपा /बां-१ /६५९/९३ दि.७-१-९३ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण चार निविदा विकल्या गेल्या.त्यापैकी एकूण दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. १-२-९३ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) मे.रे.कंस्ट्रक्शन १८.६० % जास्त
२) श्री.पी.एम.चोरडीया २२.७७ % जास्त

वरीलपैकी मे.रे.कस्ट्रक्शन यांच्या निविदाचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १८.६० % जास्त दराची निविदा आहे.दर कमी करणे बाबत कळविले असता गुत्तेदाराने लेखी कळविले आहे की, सध्या नविन ९२-९३ दरसुची प्रचलित झालेला आहे व ते दर वाढीव असल्यामुळे दिलेले दर हे योग्य आहेत.९२-९३ च्या दरसुची नुसार तुलना केली असता सध्याचे दर हे १.८४ % जास्तीचे आहेत. त्यामुळे १८.६० % जास्त दराची निविदा स्विकारणे योग्य.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रोषनगेट ते मध्यवर्ती जकात नाक्या पर्यंतच्या ८०' डी.पी.रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १८.६० % जास्त दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२२/२० :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मो.समर्थनगर येथील प्लॉट नं.१५ ते २२ च्या मागील ३०' रुंदीच्या रस्त्याचे व इतर भागातील रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रु.३,९६,०००/- चे बनविण्यात आले असुन मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.सदरील काम शासकीय अनुदान सन ९२-९३ मधुन करण्यात येईल.

सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१ /जा.क्र.मनपा /बां-१ /६५९ /९३ दि.७-१-९३ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण दहा निविदा विकल्या गेल्या त्यापैकी एकूण तीन निविदा दर भरुन प्राप्त झालेल्या त्या दि. १-२-९३ अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.जि.एम.कटारिया | ७ % जास्त |
| २) | श्री.कैसरखान | ६.१०% जास्त |
| ३) | श्री.अब्दुल सलाम | २.१०% जास्त |

वरीलपैकी श्री.अब्दुल सलाम यांचे निविदाचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २.१० % जास्त दराची निविदा आहे. दर कमी करणे बाबत कळविले असता संबंधिताने लेखी दिले आहे की,२.१० % ,ऐवजी १.६० % जास्त

दराने करण्यास संमती दर्शविली आहे. ९२-९३ च्या दरसुची नुसार तुलना केली असता १३.७२ % कमी दराने दर येत आहे. त्या करीता १.६० % जास्त दराची निविदा स्विकारणे योग्य.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.समर्थनगर येथील प्लॉट नं.१५ ते २२ च्या मागील ३०'रुंदीच्या रस्त्याचे व इतर भागातील रस्त्याचे खडीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १.६० % जास्त दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२३/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मुकुंदवाडी ते विमानतळ या जालना रोडवरील रस्त्याचे रुंदीकरण "दुभाजक" आणि रस्ता रुंदीकरण भागावर डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.७,२७,०२५/- चे अंदाजपत्रकास दि.२४-१२-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.सदरचा खर्च शासकीय अनुदान १९९१-९२ या सदराखाली करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा बां-२ / ५८७६ / ९२ दि.२८-१२-९२ द्वारे दै.लोकविजय,मुफस्सीर व औरंगाबाद टाईम्स या वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करून प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित वेळेपर्यंत एकूण दोन निविदा विक्री झाल्या व दोनच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्या खालील प्रमाणे.

१) खाजा अमिनोद्दीन — १४.९९ % जास्त दराने.
२) श्री.जे.एन.वर्मा — १८ % जास्त दराने .

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९९ % जास्त दराची श्री.खाजा
अमिनोद्दीन यांची निविदा आहे.सदरच्या कामासाठी सन ९२-९३ च्या डी.एस.आर.बरोबर तुलना केल्यास ठेकेदाराचे दर ७.७० % जास्त येतात.

करीता श्री.खाजा अमिनोद्दीन यांची १४.९९ % जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव व त्यावर जी रक्कम वाढलेली आहे त्यास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुकुंदवाडी ते विमानतळ या जालना रोडवरील रस्त्याचे रुंदीकरण "दुभाजक" आणि रस्ता रुंदीकरण भागावर डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९९ % जास्त दराची श्री.खाजा अमिनुद्दीन यांची निविदा स्विकारणेस व त्यावर वाढलेल्या रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२४/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गादीया विहार येथील ५० फुट डी.पी.रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु. ५,९८,९५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन

सदरच्या कामास दि.२२-१२-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.सदरील कामाचा खर्च सन ९२-९३ चे शासकीय अनुदानातुन करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा / बां-२ /५८७६/९२ दि.२८-११-९२ द्वारे दै.लोक विजय,मुफस्सीर औरंगाबाद टाईम्स या वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण सात कोऱ्या निविदा विक्री झाल्या.त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.खाजा अमिनोद्दीन | २०% जास्त दराने |
| २) | श्री.पी.जे.तमखाने | २०.२०% जास्त दराने |
| ३) | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | २२ % जास्त दराने |
| ४) | श्री.पी.एम.चोरडीया | २३.२३% जास्त दराने |
| ५) | श्री.ए.सी.कोठारी | २३.२४% जास्त दराने |
| ६) | मे.रे.कन्स्ट्रक्शन | २५ % जास्त दराने |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २० % जास्त दराची श्री.खाजा अमिनोद्दीन यांची निविदा आहे.सदरच्या कामासाठी सन ९२-९३ च्या डी.एस.आर.दराशी तुलना केल्यास अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३ % जास्त दराने निविदाचे दर येतात.

करीता ठेकेदार श्री.खाजा अमिनोद्दीन यांची २० % जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गादीया विहार येथील ५० फुट डी.पी.रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २० % जास्त दराची श्री.खाजा अमिनोद्दीन यांची निविदा स्विकारणेस व त्यावर जी वाढीव रक्कम येईल त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२५/२३ :**

मालमत्ता अधिकारी, मा.आयुक्त मनपा औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहेत की, अर्जदार श्रीमती विद्याबाई राजपाल मनपा स्त्री स्विपर यांनी क्रांतीनगर झ ोपडपट्टीतील सार्वजनिक संडासचे बाजुस असलेली जागा भाडयाने मिळणे बाबतची मागणी केली आहे.अर्जदार मागणी करीत असलेली जागा ३० फुट विकास योजनेतील रस्त्याने बाधीत आहे.व या प्रस्तावित जागेचे पुर्वेस मनपाचे सार्वजनिक संडास असुन ते सुध्दा ३० फुट विकास योजनेतील रस्त्यात येतात.

अर्जदार कार्यालयाची कर्मचारी आहे. प्रस्तावित जागा रस्ता विकासात बाधित असुन त्यावर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.करीता अर्जदार यांना खालील प्रमुख अटी-शर्तीवर १२ फुट x २० फुट आकाराची जागा मासिक भाडे तत्वावर ११ महिन्याचे काळासाठी देण्याबाबत विचार करता येईल.

**<u>प्रमुख अटी-शर्ती</u>**

१) ३० फुट रुंद विकास योजना रस्त्यासाठी जेव्हा जागेची गरज भासेल किंवा मनपा जेंव्हा जागा रिकामी करुन देण्यास कळविल त्यावेळी जागा खुल्या स्वरुपात परत करावी लागेल.

२) जागा रिकामी करतांना किंवा त्यापुर्वी केंव्हाही अर्जदार यांना मनपा विरुध्द कोणत्याही न्यायालयात कोणत्याही स्वरुपाचा दावा करता येणार नाही.किंवा मनाई हुकूम घेता येणार नाही.
३) जागा निव्वळ ११ महिन्याचे भाडेपट्टयाने दिली जाईल.
४) अर्जदार यांना पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही.
शिवाय नेहमीच्या इतर अटी-शर्ती राहतील.

करीता अर्जदार यांना या ठिकाणी स्थित संडासचे पश्चिमेस,संडासचे दिशेने व उत्तरेच्या दिशेने किमान १२ फुट अंतर सोडून पुर्व पश्चिम १२ फुट व उत्तर दक्षिण २० फुट आकाराची जागा अर्जदार यांना रुपये १०५=०० दरमहा भाडयाने ११ महीन्याचे काळासाठी वरील प्रमुख अटी-शर्ती व इतर आवश्यक त्या अटी-शर्तीवर देणेबाबत विचार घेणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्जदार श्रीमती विद्याबाई राजपाल (मनपा स्त्री स्विपर) यांना क्रांतीनगर झोपडपट्टीतील सार्वजनिक संडासचे बाजुस म्हणजे या ठिकाणी स्थित संडासचे पश्चिमेस, संडासचे दिशेने व उत्तरेच्या दिशेने किमान १२ फुट अंतर सोडून पुर्व पश्चिम १२ फुट व उत्तर दक्षिण २० फुट आकाराची जागा दरमहा रुपये १०५=०० भाडयाने ११ महिन्याचे काळासाठी खालील प्रमुख अटी-शर्ती व इतर आवश्यक (नेहमीच्या) अटी-शर्तीवर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>प्रमुख अटी-शर्ती</u>**

५) १) ३० फुट रुंद विकास योजना रस्त्यासाठी जेव्हा जागेची गरज भासेल किंवा मनपा जेंव्हा जागा रिकामी करुन देण्यास कळविल त्यावेळी जागा खुल्या स्वरुपात परत करावी लागेल.
६) जागा रिकामी करतांना किंवा त्यापुर्वी केंव्हाही अर्जदार यांना मनपा विरुध्द कोणत्याही न्यायालयात कोणत्याही स्वरुपाचा दावा करता येणार नाही.किंवा मनाई हुकूम घेता येणार नाही.
७) जागा निव्वळ ११ महिन्याचे भाडेपट्टयाने दिली जाईल.
८) अर्जदार यांना पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही.
(शिवाय नेहमीच्या इतर अटी-शर्ती राहतील.)
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२६/२४ :**

उप आयुक्त मनपा औरंगाबाद यांनी प्रस्तावित केले की, महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने १-४-९३ पासुन खालीलप्रमाणे फी वाढीव व्हावी.

अ) पडेगांव कत्तलखान्यातील बीफ शहरामध्ये वेगवेगळया ठिकाणी बिफ वाहतुक फी प्रती जनावर रुपये ४.०० प्रमाणे घेण्यात येत आहे.सदर दर सध्या अस्तित्वात असलेले रुपये ४.०० पासुन रुपये १० (दहा) वाढविण्याच्या बद्दल विचारास्तव सादर.

ब) सध्या मांस विक्री परवाना (मु.प्रा.मनपा अधिनियमाचे कलम ३८१-३८२ प्रमाणे) परवाना फीस रुपये २५.०० (नविनसाठी) व रुपये २०.०० (नुतनीकरणासाठी) लावण्यात येते.सदर फी रुपये ५० (नवीन परवाना) व रुपये ४० (नुतनीकरण) वाढ करण्याबद्दलचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने दिनांक १-४-९३ पासुन पडेगांव कत्तलखान्यातील व मांस विक्री परवान्याकरीता खालीलप्रमाणे फी वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | | सध्याचे फी दर | वाढीव फी दर |
|---|---|---|---|
| १ | पडेगांव कत्तलखान्यातील बीफ शहरामध्ये वेगवेगळया ठिकाणी वाहतुक करणे.(प्रति जनावर) | ४.०० | १०.०० |
| २ | मांस विक्री परवाना फी (मु.प्रां.मनपा अधिनियमाचे कलम ३८१-३८२ प्रमाणे) | | |
| अ) | नविन परवान्याकरीता | २५.०० | ५०.०० |
| ब) | नुतनीकरण | २०.०० | ४०.०० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२७/२५ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल येथे १०० मी.मी.व १५० मी.मी.व्यासाची ए.सी.पाईप लाईन टाकण्याचे कामासाठी रु.३,७१,३५८/- चे अंदाजपत्रक सन ९१-९२ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरचा खर्च महाराष्ट्र शासन अनुदान सन ९०-९१ मधुन करण्यात येणार आहे.

सदरील कामासाठी दै.लोकविजय,स्वरगंगा व दै.रहेबर या स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर लघुनिविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा विक्री झाल्या त्या खालीलप्रमाणे.

१) शे.शरीफ मुन्सी ६.७८६ % कमी दराने
२) इ.एम.सजनानी ५ % कमी दराने

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.७८६% कमी दराची श्री.शे.शरीफ शे.मुन्सी यांची निविदा आहे. मा.आयुक्तांनी सदरील निविदेस मान्यता दिलेली आहे.तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल येथे १०० मी.मी.१५० मी.मी.व्यासाची ए.सी.पाईप लाईन टाकण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.७८६% कमी दराची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

(स्थायी समिती ठराव क्रमांक ४३४/२९ दि.२३-१२-९२ च्या अनुषंगाने)

**मा.सभापती :** ब्रिजवाशी उद्योग लिमिटेड ही कंपनी अग्निशमन फायर टेंडर (फॅब्रीकेशन) करुन परदेशात विकत आहे.कन्सेप्ट इंजिनिअरींग हया कंपनीने परदेशात एकही टेंडर विकलेले नाही. फक्त लोकल वॉर्डलाच विकलेले आहे.

ब्रीजवाशी उद्योग या कंपनीने अग्निशमन साहित्यासह फायर टेंडर फॅब्रीकेशनचे दर दिलेले नाहीत.

म्हणून ब्रीजवाशी उद्योग लिमिटेड ही कंपनी आंतरराष्ट्रीय फायर टेंडर सप्लाय करीत आहे.

**मा.सभापती :** दि.१३-१-९३ च्या स्थायी समिती सभेचा ठराव क्र.४६६/३२ च्या कामाकरीता पुन्हा दरपत्रके न मागविता तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दर असलेल्या गुत्तेदार श्री.एम.ए.अजिज यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५० % कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२८/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, ज्युबली पार्क चौक ते डॉ.आंबेडकर लॉ कॉलेज ते मकई गेट पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रुपये ११,९१,४२०/- ला मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान सन ९२-९३ मधुन करण्यात येईल.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१७ दिनांक ७-१-९३ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा विक्री झाल्या.पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.पी.एम.चोरडीया | १८.७७ % जास्त |
| २) | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | २५ % जास्त |
| ३) | मे.रे.कन्स्ट्रक्शन | २२ % जास्त |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.७७ % जास्त दराची श्री.पी.एम.चोरडीया यांची निविदा आहे.सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार तुलना केली असता उपरोक्त दर ३.९३ % कमी येतात करीता १८.७७ % जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ज्युबली पार्क चौक ते आंबेडकर लॉ कॉलेज ते मकईगेट पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.७७ % जास्त दराची श्री.पी.एम.चोरडीया यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५२९/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मो.नारळीबाग अप्सरा सिनेमा ते जिल्हा परिषद निवासस्थाने व अप्सरा सिनेमा ते भडकलगेट भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ९,३९,६८०/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.सदरील कामाचा खर्च सन ९२-९३ च्या शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.१७ दि.७-१-९१ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विक्री झाल्या पैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.खाजा अमिनोद्दीन २० % जास्त
२) श्री.पी.जे.तमखाने १५.३१ % जास्त

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.३१ % जास्त दराची श्री.पी.जे.तमखाने यांची निविदा आहे.दर कमी करणे बाबत कळविले असता गुत्तेदाराने लेखी दिले की,९२-९३ च्या दरसुची प्रमाणे दर योग्य आहेत.९२-९३ च्या दरसुचीनुसार तुलना केली असता ०.८३५ % कमी दर येतात.करीता १५.३१ % जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.नारळीबाग,अप्सरा सिनेमा ते जिल्हा परिषद निवासस्थाने व अप्सरा सिनेमा ते भडकलगेट भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.३१% कमी दराची श्री.पी.जे.तमखाने यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३०/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, अभिनय सिनेमा ते जाफरगेट मोंढा व्हाया रविवार बाजार हया रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुची नुसार रक्कम रु.६,३१,६००/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदानसन ९२-९३ मधुन करण्यात येईल.

सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा नोटीस क्र. १७ जा.क्र.मनपा/बां-१/६५९/९२ दि.७-१-९३ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा विक्री झाल्या.त्यापैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.खाजा अमिनुद्दीन | २६% जास्त |
| २) | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | २५% जास्त |
| ३) | श्री.ए.सी.कोठारी | १७.४८%जास्त |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.४८% जास्त दराची श्री.ए.सी.कोठारी यांची निविदा आहे.दर जास्त असल्याकारणाने संबंधितास दर कमी करणेबाबत कळविले असता अंदाजपत्रक ९१-९२ च्या दरसुची प्रमाणे आहे.सन ९२-९३ च्या दरसुची प्रमाणे तुलना केली असता १.६६ % जास्त दर येतात.तरी १७.४८% जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अभिनय सिनेमा ते जाफरगेट मोंढा व्हाया रविवार बाजार हया रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.४८ % जास्त दराची श्री.ए.सी.कोठारी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३१/२९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,मोतीवाला नगर येथील ५० फुट डी.पी.रस्ता व एच.पी.कल्वर्ट तयार करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.४,११,९७०/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.सदरील कामाचा खर्च ९२-९३ च्या शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.१८ जा.क्र.मनपा/बां.-१/६५८/९३ दि. ७-१-९३ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण नऊ निविदा विक्री झाल्या.पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्याखालीलप्रमाणे आहे.

१) श्री.एस.एम.मंडोरे १० % जास्त
२) श्री.जी.एम.कटारीया ४.९५ % जास्त
३) श्री.ए.सी.कोठारी ४.९९ % जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५ % कमी दराची श्री.जी.एम.कटारीया यांची निविदा आहे.दर कमी करणेबाबत कळविले असता गुत्तेदाराने लेखी कळविले आहे की,९१-९२ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक आहे ते परवडत नाही.नविन दरसुची ९२-९३ च्या नुसार तुलना केली असता सदरील दर ६.३३ % कमी येतात.करीता ४.९५% जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मोतीवाला नगर येथील ५० फुट डी.पी.रस्ता व एच.पी.कल्वर्ट
तयार करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५ % जास्त दराची श्री.जी.एम.कटारीया यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३२/३० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, श्रीनिकेतन कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ३,२२,६००/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.सदरील कामाचा खर्च सन ९२-९३ च्या शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१८ दि.७-१-९३ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विक्री झाल्या.पैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झ ाल्या त्या खालीलप्रमाणे.

१) मे.रे.कन्स्ट्रक्शन २२ % जास्त
२) श्री.खाजा अमिनुद्दीन १८.८६ % जास्त

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.८६% जास्त दराची श्री.खाजा अमिनुद्दीन यांची निविदा आहे.दर जास्त असल्या कारणाने संबंधितास दर कमी करणे बाबत कळविले असता गुत्तेदाराने लेखी कळविले की,अंदाजपत्रक ९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे आहे व नविन ९२-९३ च्या दरसुचीनुसार तुलना केली असता दिलेला दर १.२८% जास्त येतात.त्यामुळे १८.८६ % जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीनिकेतन कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.८६ % जास्त दराची श्री.खाजा अमिनुद्दीन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३३/३१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,मो.नागेश्वरवाडी प्राथमिक शाळेच्या इमारतीच्या पहिल्या मजल्याचे बांधकामासाठी स्थायी समिती ठराव क्र.१७७/२६ दिनांक २४-७-९२ अन्वये रक्कम रु.४,२८,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आलेली आहे.

सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/शअ/७९२/दिनांक ४-१२-९२ अन्वये बी-१ नमुन्यात दैनिक मराठवाडा,सकाळ,औरंगाबाद टाईम्स या दैनिकात जाहीरात देवून निविदा मागविल्या असता एकूण पाच कोऱ्या निविदा विक्री झाल्या पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.एल.एम.पडघन | ११ % जास्त दराने |
| २) | श्री.जी.एस.पवार | १९ % जास्त दराने |
| ३) | श्री.सुखबिरसिंग | २० % जास्त दराने |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११ % जास्त दराची श्री.एल.एम.पडघन यांची निविदा होती. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे दर कमी करण्याकरीता मा.आयुक्तांचे आदेशान्वये कार्यालयीन पत्र क्र.मनपा/शअ/४२/९२ दिनांक १०-२-९३ अन्वये गुत्तेदारास मा.आयुक्तांचे दालनात वाटाघाटी अंती मा.आयुक्तांनी वाहनात सदरचे काम हे ११ % जास्त दराऐवजी ९ % जास्त दराने करण्यास दि.१६-२-९३ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

तरी सदर काम श्री.एल.एम.पडघन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९ % जास्त दराने करून घेण्यास्तव प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.नागेश्वरवाडी येथील प्राथमिक शाळेच्या इमारतीच्या पहिल्या मजल्याचे बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दर असलेले निविदा धारक श्री.एल.एम.पडघन यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे उपरोक्त काम श्री.एल.एम.पडघन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९ % जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३४/३२ :**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.औरंगपुरा भाजी मार्केटच्या रोडवरील दुकानाचे बांधकाम करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. १७-१०-९२ ठराव क्र.३०० अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु.७,२०,०००/- ला सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे.रंगारगल्लीतील दुकाने शहर विकास डी.पी.शेडमध्ये तुटत असल्यामुळे सदरच्या दुकानदारांना त्वरीत व्यवस्था करण्यासाठी औरंगपुरा मध्ये दुकान बांधुन द्यावयाचे ठरल्यानुसार सदर कामाची अल्प मुदतीची निविदा क्र.मनपा/शअ/८/९३ दि. ८-१-९३ अन्वये वृत्तपत्रात जाहीरात देवून बी-१ निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (४) निविदा विक्री झाल्या.निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या.त्या दि. १-२-९३ ला उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.कुलवंतसिंग | १४ % | जास्त दराने |
| २) श्री.एस.ए.नवाब | १३.१३ % | जास्त दराने |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.१३% जास्त दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा आहे.सदरचे कामाचे दर हे सन १९९१-९२ चे डी.एस.आर.दराने तयार केलेले आहे.सन १९९२-९३चे डी.एस.आर.दराने सदरच्या दराची तुलना केल्यास सदरचे काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.०६% कमी येतात तसेच सदर दराचे वाटाघाटी होवून सदरचे काम हे मा.आयुक्तांशी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.१३% जास्त ऐवजी १२% जास्त दराने मान्य केलेले आहे.सबब कामाचे गांभीर्य लक्षात घेता अंदाजपत्रकीय दरापेक्षा१२% जास्त दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.औरंगपुरा भाजी मार्केटच्या रोडवरील दुकानांचे बांधकाम करणेच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमर व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% जास्त दराचे गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचे निविदा पत्रकास वाटाघाटी अंती सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच सदर कामाचे गांभीर्य लक्षात घेता सदर प्रस्तावास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३५/३३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, साईट क्र.२ आमखास मैदानामध्ये खडी रस्ते,पाईप लाईन,चौकीदार निवास बांधणे बाबत कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,२२,८६०/- चे सन १९९०-९१ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले.अंदाजपत्रक रकमेस मा.आयुक्तांची मंजुरी मिळालेली आहे. सदरचा खर्च शासकीय अनुदान सन १९९०-९१ या अंतर्गत करण्यात येईल.

सदर कामाचे "बी-१" नमुन्यात निविदा सुचना ९२-९३ पत्र क्र.७९२-९२ दिनांक ४-१२-९२ द्वारे शहरातील दै.मराठवाडा,दै.सकाळ,दै.औरंगाबाद टाईम्स इत्यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द करून मागविण्यात आले.या अनुषंगाने विक्रीच्या तारखे अंतिम कोरे निविदा फॉर्म एकूण (१५) पंधरा विकण्यात आले व स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत सिलबंद पाकीटात दर भरुन निविदा दोन (२) प्राप्त झाले.उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यात आले त्यात दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) अशोक शिंदे | ४.९५% | अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जास्त |
| २) एस.एच.असोशिएटस | ११% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५% जास्त दराचे श्री.अशोक शिंदे गुत्तेदार यांचे दरपत्रक आहे. मा.आयुक्तांच्या आदेशावरुन संबंधितास दर वाटाघाटी करीता बोलावले असता वाटाघाटी अंती ४.९५%जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.९५% जास्त दराने काम करण्यास संबंधिताने संमती दर्शविली आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, साईट क्र.२ आमखास मैदान येथे उद्यानामध्ये खडी रस्ते,पाईप लाईन,चौकीदार निवास बांधणे बाबतचे कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.९५% जास्त दराचे गुत्तेदार श्री.अशोक शिंदे यांनी काय करणेस संमती दर्शविलेली असल्यामुळे त्यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते व सदर कामास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३६/३४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पिरबाजार उस्मानपुरा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सात फुटी उंचीचा पुर्णाकृती ब्रांझचा पुतळा बसविणेसाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन पुतळा खरेदीसाठी रक्कम रु.१,६०,०००/- व त्यासाठी बांधकाम करणेस्तव रक्कम रु. १,४५,०००/- असा एकूण रु.३,०५,०००/- चा खर्च येणार असून पुतळा बसविणेसाठी यापुर्वी सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.१६३/७ दिनांक ११-४-९१ रोजी ठराव मंजुर झालेला आहे.

तरी पुतळा खरेदी करुन बसविणेसाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. ३,०५,०००/- ला मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर."सदरचा खर्च पुतळे खरेदी या शिर्षकाखाली करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पिरबाजार उस्मानपुरा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सात फुटी उंचीचा पुर्णाकृती पुतळा खरेदी करुन बसविणेसाठी तयार करण्यात आलेले रक्कम रु. ३,०५,०००/- चे अंदाजपत्रकास व सदरचा खर्च पुतळे खरेदी या शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदर प्रस्तावास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३७/३५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संत एकनाथ रंग मंदिर ते शहा कॉलनी पर्यंत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९२-९३ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु. ४,७५,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास दिनांक १८-१२-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.सदरचा खर्च शासकीय अनुदान १९९२-९३ या सदराखाली करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/बां-२/५८७६/९२/दिनांक २८-१२-९२ द्वारे दै.लोकविजय,दै.मुफस्सीर व दै.औरंगाबाद टाईम्स या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करून प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत वेळेपर्यंत एकूण सात निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकारणेच्या नियोजीत वेळेला एकूण पांच निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असुन त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.पी.एम.चोरडीया | १७.१७%जास्त दराने |
| २) | श्री.पी.जे.तमखाने | १९% जास्त दराने |
| ३) | मे.रे.कन्स्ट्रक्शन कं. | २२% जास्त दराने |
| ४) | मे.गुरुनानक इंन्डस्ट्रीज | २२% जास्त दराने |
| ५) | श्री.ए.सी.कोठारी | २३.२५%जास्त दराने |

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७.१७% जास्त दराने श्री.पी.एम.चोरडीया यांची निविदा प्राप्त झाली.सदरील कामासाठी सन १९९२-९३च्या डि.एस.आर.बरोबर तुलना केली असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५६% जास्त दराने निविदेचे दर आले आहेत.

तरी सर्वात कमी व सन १९९१-९२ चे डि.एस.आर.दराप्रमाणे १७.१७% जास्त दराने श्री.पी.एम.चोरडीया यांची निविदा असुन सन १९९१-९२ चे डि.एस.आर.दरानुसार ठेकेदाराने दिलेल्या दराचे वाढीव रक्कमेस व निविदेस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत एकनाथ रंगमंदिर ते शहा कॉलनी पर्यंत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.१७% जास्त दराचे गुत्तेदार श्री.पी.एम.चोरडीया यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते व सदर प्रस्तावास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १६-३-१९९३ रोजी दुपारी ३=३० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. सोमवार दिनांक १-३-९३ रोजी दुपारी ३=३० वाजता समिती सभागृहात मा.सभापती ॲड.श्री.इगबालसिंग गिल यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.**

**या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१) मा.श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
२) मा.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
३) मा.श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी.

**विषय क्र.५३८/१ :**
महानगरपालिकेतील अस्तित्वात असलेल्या दुकानांच्या भाडयाने दर वाढविणे बाबत.

**ठराव :**

**सर्व मार्केट**

१) दरमहा भाडे १रुपये ते १०० रुपये पर्यंत असलेल्या भाडयात ६०% दर वाढ.
२) दरमहा भाडे १०१ ते २०० रुपये पर्यंत असलेल्या भाडयात ४०% दर वाढ.
३) दरमहा भाडे २०१ ते पुढे असलेल्या भाडयात २०% दर वाढ.
(वरीलप्रमाणे दरवाढ करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.)

**-: सुपर मार्केटच्या गाळयाचे दरमहा भाडे :-**

१) रुपये १ ते २००० पर्यंत २०% दर कमी करावे.
२) रुपये २००१ ते ३००० पर्यंत २५% दर कमी करावे.
३) रुपये ३००१ ते ४००० पर्यंत ३०% दर कमी करावे.
४) रुपये ४००१ ते त्यापुढे ३५% दर कमी करावे.

वरीलप्रमाणे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**मा.उप आयुक्त :** वरील दर जास्त किंवा कमी करण्याबाबत दर तपासणी करुन मा.आयुक्तांकडे सादर करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १९-३-९३ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत.**

**शुक्रवार दिनांक १९-३-९३ रोजी दुपारी ३=३० वाजता समिती सभागृहात मा.सभापती ॲड.श्री.इगबालसिंग गिल यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.**

**या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१) मा.श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
२) मा.श्री. भगुरे तुळशीराम छगन
३) मा.श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
४) मा.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
५) मा.श्री. जावेद हसनखान कासीम हसनखान
६) मा.श्री. मोहमंद ईस्माइल अ.करीम
७) मा.श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
८) मा.श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
९) मा.श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव.

**विषय क्र.५३९/१ :**

दि.२२-१-९३ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभा व दि.१-३-९३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.जावेद हसनखान,श्री.अजिजुल्ला बेग :** उर्दु अजिंडा मिळाला नाही म्हणून आपला निषेध नोंदवावा.

तसेच दर वर्षीप्रमाणे याहीवर्षी इदच्या नमाजीसाठी इदगा येथे मुरुम टाकून साफसफाई करण्यात यावी.तेथे चुना लावण्यात यावा व मैदानात चुन्याच्या लाईन मारुन व त्या ठिकाणी लाल माती टाकण्यात यावी.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** नेहरु रोजगार योजने बाबत दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या सबसिडी बाबतच्या बातमी विषयी खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** प्रकल्प अधिकारी सभागृहात नाहीत.तरी त्यांना बोलावून घेण्यात यावे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** संबंधित अधिकारी नसतील तर उप आयुक्तांनी माहिती द्यावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** जकात बाबत नवा मराठा मध्ये आलेल्या माहिती बाबत या सभेत खुलासा करणार होते.त्याची माहिती द्यावी.

**मा.उप आयुक्त :** संबंधित अधिकाऱ्यांना नोटीसा देवून माहिती मागविली आहे.संबंधित वर्तमान पत्राचे संपादकाला नोटीस देण्याबाबत विधी सल्लागार यांना सुचना दिल्या आहेत.

**श्री.गिरजाराम हाळनोर,श्री.मधुकर शिंदे :** माजी आयुक्त यांनी बदली बाबत जे पत्रक काढले होते त्याची प्रत सभागृहात दाखवावी.तसेच दहा,पाच,तीन,वर्षापासुन जे जकात विभागात काम करत आहेत.त्याची माहिती सभेत द्यावी.जकात विभागातुन ज्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या यापुर्वी करण्यात आल्या होत्या त्यांच्या बदल्या दोन-तीन महिन्यात पुन्हा जकात विभागात झाल्या आहेत. हे खरे आहे का? याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** एप्रिल मध्ये बदल्या होणार आहेत. जर बदल्या झाल्या नाही तर मा.आयुक्तांना विचारणा करता येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर,श्री.मधुकर शिंदे :** एक एप्रिल पर्यंत बदल्या होतील काय?

**मा.उप आयुक्त :** पंधरा एप्रिल पर्यंत तीन वर्षापेक्षा जास्त काळ काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या होतील.

**श्री.अजिजुल्ला बेग :** सहाय्यक आयुक्त-२ यांनी याबाबत काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**सहाय्यक आयुक्त :** तीन वर्षापेक्षा जास्त काळ एका विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी तयार करण्यात आलेली आहे.

**मा.उप आयुक्त :** पंधरा एप्रिल पर्यंत निश्चित बदल्या होतील.

**श्री.तुळशीराम भगुरे :** मालमत्ता कर लावण्यासाठी कोणकोणते कागदपत्र दाखल करावे लागतात.खुलासा व्हावा.

**करमुल्य निर्धारण अधिकारी :** बांधकाम परवानगी पुर्णत्वाचे प्रमाणपत्र,पी.आर.कार्ड इत्यादी कागदपत्र दाखल केल्यावर कर आकारण्यात येतो.

विनापरवानगी बांधकामासाठी माग रजिस्ट्री किंवा बॉन्ड किंवा इतर (वाटणीपत्र) कागदपत्र दाखल केल्यावर कर आकारण्यात येतो.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** मा.आयुक्तांनी नळ कनेक्शनच्या संचिका १५ मार्च पर्यंत स्विकाराव्यात असा आदेश काढला होता.त्याची मुदत ३१ मार्च पर्यंत वाढवावी.

**मा.सभापती :** नविन नळ कनेक्शनच्या संचिका ३१ मार्च पर्यंत स्विकारण्यात येतील.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** उद्यान अधिक्षक व पशुधन विकास अधिकारी यांचे काय काम आहे.

**मा.उप आयुक्त :** मा.आयुक्तांनी आदेश दिल्यावर त्यांना जे काम दिले आहे ते करु शकतात.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** जनावारासाठी लागणारे खाद्य वगैरे पशुधन विकास अधिकारी कसे मागवतात.

**मा.उप आयुक्त :** मा.आयुक्तांनी उद्यान अधिक्षक व पशुधन अधिकारी अधिकार प्रदान केल्यानंतर त्यांच्या विभागासाठी संबंधित सर्व कामे करतात.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** कायद्यात तसी तरतुद आहे काय?दाखवावी.

**विधी सल्लागार :** ६९ (बी) मध्ये मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्याची नियमात तरतुद आहे.

**मा.सभापती :** प्रकल्प अधिकारी सभागृहात आले आहेत त्यांनी १५ लाख रुपयें सबसिडी बँकात पडुन आहेत असे जे वृत्त वर्तमानपत्रात प्रसिध्द झाले आहे.त्याचा खुलासा करावा.

**प्रकल्प अधिकारी :** सन १९९१ पासुन अनुदानाची जी रक्कम मंजुर झाली आहे ती रक्कम जसे जसे प्राप्त झाली त्याप्रमाणे बँकात जमा झालेली आहेत.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** प्रकल्प अधिकाऱ्याने जी नगरसेवकांना माहिती दिली होती.ती सभागृहापुढे ठेवावी.सदरील प्रकरणामध्ये जातीयवाद आहे.कारण मा.आयुक्तांनी प्रत्येक नगरसेवकांचे (१०) दहा प्रकरणे दिले होते.परंतु नगरसेवकांनी जी नांवे दिली होती त्यांना एकालाही सबसिडी लोन दिलेले नाही.फक्त मनपा कर्मचाऱ्याचे नातेवाईकांना लोन देण्यात आलेले आहे.

**प्रकल्प अधिकारी :** प्रकल्पाकडे प्राप्त झालेली कर्ज प्रकरणे बँकाना पाठविली जातात.त्यावर बँक अधिकारी तपासणी करुन मंजुर अथवा नामंजुरीची कार्यवाही करतात.कर्ज अथवा अनुदान मंजुरीचे अधिकार मनपास नाहीत. बँक मासिक अहवाल पाठवित नाही म्हणून समस्या उद्‌भवतात. सदर प्रश्न मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा नेहरु रोजगार योजना समितीत मी वेळोवेळी मांडला आहे. स.नगरसेवकांनी आपल्या वार्डातील प्रकरणांची नांवे द्यावीत ती बँकाना पाठविण्यात येतील.त्यात जातीवाद करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. आतापर्यंत ४२८ कर्ज प्रकरणे मंजुर झाली आहेत.

**श्री.अलीम बेग :** सदरील समितीमध्ये मा.महापौर, उपमहापौर किंवा सभापती किंवा नगरसेवक यांचा समावेश नाही.

**श्री.नारायण फत्तेलष्कर :** जोपर्यंत नेहरु रोजगार योजनेची संपुर्ण माहिती मिळत नाही तोपर्यंत सभा तहकुब करावी. कारण येथे जातीवादी राजकारण चालत आहे.जोपर्यंत अधिकाऱ्यांना केसेस मागे पैसे दिले जात नाही तोपर्यंत कर्ज मंजुर होत नाहीत.पैसे दिले की कर्ज मंजुर होतात.

**मा.उप आयुक्त :** स.नगरसेवकांनी प्रशासनाला वेडे वाकडे व अपमानकारक शब्द वापरले म्हणून आम्ही सर्व अधिकारी ०५ मिनिट सभात्याग करत आहोत. (४.२५ वाजता)

**सहाय्यक आयुक्त :** ०.०५ मिनिटांनी महानगरपालिका ऑफीसर असोशिएनचे अध्यक्ष यांनी सभेवर सर्व ऑफिसरनी बहिष्कार टाकला.

**श्री.अजिजुल्ला बेग :** इतिवृत्ताचे पान सातमध्ये श्री.खलील अहेमद यांना पदोन्नती देण्याबाबत जो अन्याय झाला आहे त्याचा खुलासा ३० दिवसात अर्जदारास खुलासा करावा असे ठरले होते याबाबत खुलासा व्हावा. तसेच इतिवृत्त पान पाच मध्ये श्री.विष्णु वझे शाखा अभियंता यांना प्रशासनाचा विचार तीस दिवसात कळवायचा होता ते कळविले का?

इतर काम सिस्टीम ७० हजार रुपयाला घेतली परंतु त्याचे साहित्य बऱ्याच विभागात धुळखात पडले आहे. याचे खर्चाबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** अधिकारी वर्गानी सभेवर बहिष्कार टाकला आहे तरी याची चर्चा पुढील सभेत ठेवावी.

**श्री.अजिजुल्ला बेग,श्री.नारायण फत्तेलष्कर,श्री.गिरजाराम हाळनोर :** मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४३(३) अन्वये फर्मान काढून संबंधित अधिकाऱ्यांना बोलवावे. त्याप्रमाणे सहाय्यक आयुक्त-१ यांना बोलावण्यात आले परंतु ते १५ ते २० निनिटापर्यंत आले नाहीत.

**मा.उप आयुक्त :** संबंधित विभागाचे कारकुन यांनी सभेत येवून स.आयुक्त हेअरींगच्या केसेस फायनल करणे मा.आयुक्तांकडे आहे तरी हया वरील प्रकरणासंबंधी प्रशासनाची बाजु अगोदरच लेखी कळविली आहे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४३ (३) अन्वये संबंधित अधिकाऱ्याला बोलावले हजर झाले नाहीत.त्यासाठी सभागृहाचा अर्धा तास बोलावण्यात वाया गेला म्हणून मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये संबंधितास निलंबित का करण्यात येवू नये म्हणून कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी.

**ठराव :**

दिनांक २२-१-९३ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४०/२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन ९२-९३ वर्षाकरीता पाणी पुरवठा विभागा अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याच्या कामाकरीता लागणारे "इंझीलीक मेकॅनिकल जॉयंटस" खरेदी करणे आहे.सदरील साहित्य खरेदी करणेच्या रक्कम रु.४,८८,२२१/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दिनांक २२-२-९३ रोजी मंजुरी दिली आहे.प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन ९२-९३ वर्षाकरीता पाणी पुरवठा विभागा अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४,८८,२२१/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४१/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कटकटगेट जवळील औरंगाबाद टाईम्स सोसायटी जवळ एच.पी.कल्वर्ट बांधण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.३,४३,८४०/-च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.सदरील कामाचा खर्च सन ९२-९३ च्या शासकीय अनुदानामधुन करावयाचा आहे.

सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१८ दि. ७-१-९३ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण नऊ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या.पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) श्री.अब्दुल सलाम | १०.१०% | जास्त |
| २) जी.एम.कटारीया | १५% | जास्त |
| ३) श्री.कैसरखान | ६% | जास्त |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६% जास्त दराची श्री.कैसरखान यांची निविदा आहे.दर जास्त असल्या कारणाने संबंधितास दर कमी करणे बाबत मा.आयुक्तांकडे बोलाविले असता संबंधिताने सदरील काम ६% जास्त ऐवजी ४% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कटकटगेट जवळील औरंगाबाद टाईम्स सोसायटी जवळ एच.पी.कल्वर्ट बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ४% जास्त दराच्या गुत्तेदार श्री.कैसरखान यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४२/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जालना रोड ते जाफरगेट पर्यंतच्या १०० फुट डी.पी.रस्त्याच्या विकास कामापैकी डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम

रु.१५,१०,९७०/-या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९०-९१ च्या शासकीय अनुदानातुन करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.१९ दि.१-२-९३ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण फक्त एकच निविदा विक्री झाली व ती एकच दरनिर्दिष्ट निविदा मे.गुरुनानक इंडस्ट्रीज यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त दराची प्राप्त झाली.

सदरील अंदाजपत्रक जुने आहे.सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार तुलना केली असता सदरील दर १.२७% जास्त येतात.तरी मे.गुरुनानक इंडस्ट्रीज यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त दराच्या निविदेस मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोड ते जाफरगेट पर्यंतच्या १०० फुट डी.पी.रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी निविदा मागविले असता एकच निविदा प्राप्त झ ाली.मेसर्स गुरुनानक इंडस्ट्रीज यांची त्यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त आहे.सदरील अंदाजपत्रक जुने आहे.सन ९२-९३ च्या दरसुची नुसार तुलना केली असता सदरील दर १.२७% जास्त येत आहे. करीता सर्वानुमते मेसर्स गुरुनानक इंडस्ट्रीज यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.कामाची तातडी लक्षात घेता याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४३/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मा.प.महाविद्यालय ते नागेश्वरवाडी (खडकेश्वर) पर्यंत ५० फुट नियोजीत विकास रस्ता तयार करण्याच्या कामापैकी डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९०-९१ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.सदरील कामाचा खर्च सन १९९०-९१ च्या शासकीय अनुदानातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१९ दि.१-२-९३ अन्वये निविदा मागविल्या असता फक्त एकच कोरी निविदा विक्री झाली व ती श्री.खाजा अमिनुद्दीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५४% जास्त दराची दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाली.

सन ९२-९३ च्या दरसुचीनुसार तुलना केली असता सदरील दर ४.०१% जास्त येतात.करीता श्री.खाजा अमिनुद्दीन यांची ५४% जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.प.महाविद्यालय ते नागेश्वरवाडी (खडकेश्वर) पर्यंत ५० फुट नियोजीत विकास रस्ता तयार करण्याच्या कामापैकी डांबरीकरण करण्याच्या कामासाठी श्री.खाजा अमिनुद्दीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५४% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४४/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बलवंत वाचनालय ते उच्च न्यायालय या ८० फुट डी.पी.रस्त्यावर पुल बांधण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१६,२४,०००/- च्या

अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदानातुन करण्यात येईल.

सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा नोटीस क्र.१९ दि.१-२-९३ अन्वये निविदा मागविल्या असता एक कोरी निविदा विक्री झाली व ती श्री.डी.अजितसिंग यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% जास्त दराची निविदा प्राप्त झाली.

नविन दरसुचीनुसार तुलना केली असता ११.६८% जास्त दर येतात.दर जास्त असल्याकारणाने संबंधित गुत्तेदारास मा.आयुक्तांच्या दालनात वाटाघाटी करीता बोलावले असता संबंधिताने सदरील काम २५% जास्त ऐवजी २२% जास्त दराने काम करण्यास सम्मती दर्शविली आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बलवंत वाचनालय ते उच्च न्यायालय या ८० फुट डी.पी.रस्त्यावर पुल बांधण्याच्या कामासाठी श्री.डी.अजितसिंग यांच्याशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय २२% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४५/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, अदालत रोड ते पिरबाजार व्हाया एस.एस.सी.बोर्ड या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर.दराने रक्कम रु.६,९७,७००/- च्या अंदाजपत्रकास दि.१८-१२-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च सन १९९२-९३ चे शासकीय अनुदानातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/बांध-२/५८७६/९२ दिनांक २८-१२-९२ अन्वये दैनिक लोकविजय,दै.मुफस्सीर व दै.औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण सात कोऱ्या निविदा विक्री झाल्या पैकी पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | १७.७२% जास्त दराने |
| २) | श्री.पी.जे.तमखाने | २०% जास्त दराने |
| ३) | मे.रे.कन्स्ट्रक्शन | २२% जास्त दराने |
| ४) | श्री.पी.एम.चोरडीया | २३.२३% जास्त दराने |
| ५) | श्री.ए.सी.कोठारी | २३.२४% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.७२%जास्त दराची मे.गुरुनानक इंडस्ट्रीज यांची निविदा आहे.परंतु ठेकेदाराने सदरचे दर हे सन ९१-९२ चे डी.एस.आर.शी तुलना केली असता हेच दर ०.९५% जास्त येतात.

करीता मे.गुरुनानक इंडस्ट्रीज यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.७२% जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव व वाढीव रकमेस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अदालत रोड ते पिरबाजार व्हाया एस.एस.सी.बोर्ड या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी मेसर्स गुरुनानक इंडस्ट्रीज यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.७२% जास्त दराची निविदा स्विकारणेस तसेच वाढीव रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४६/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पन्नालालनगर व श्रेयनगर येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९१-९२ च्या सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५,९८,८५०/- च्या अंदाजपत्रकात दिनांक १८-१२-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च सन ९२-९३ चे शासकीय अनुदानातुन करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/बांध-२/५८७६/९२ दिनांक २८/१८/९२ द्वारे दै.लोकविजय,मुफस्सीर,व औरंगाबाद टाईम्स या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण सात कोऱ्या निविदा विक्री झाल्या पैकी चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्याखालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.ए.सी.कोठारी | १७.१७% जास्त दराने |
| २) | मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | २०% जास्त दराने |
| ३) | मे.रे.कन्स्ट्रक्शन | २२% जास्त दराने |
| ४) | श्री.पी.एम.चोरडीया | २३.२३% जास्त दराने |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.१७% जास्त दराची श्री.ए.सी.कोठारी यांची निविदा आहे.ठेकेदाराने सदरचे दर हे सन ९१-९२ चे डि.एस.आर.दराने दिलेले आहेत.सन ९२-९३ चे डि.एस.आर.शी तुलना केल्यास हेच दर २.८२% जास्त येतात.

करीता श्री.ए.सी.कोठारी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.१७% जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव व जास्त दर आल्यामुळे वाढीव रक्कमेस मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पन्नालालनगर व श्रेयनगर येथील रोडचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी श्री.ए.सी.कोठारी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.१७% जास्त दराची निविदा स्विकारणेस व येणाऱ्या वाढीव खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४७/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा ते टिळकनगर पर्यंत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९१-९२ चे सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.५,५०,०००/- चे अंदाजपत्रकास दिनांक १८-१२-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.सदरचा खर्च शासकीय अनुदान सन ९२-९३ या सदराखाली करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/बां-२/५८७६/९२ दिनांक २८-१२-९२ अन्वये दै.लोकविजय,मुफस्सीर व दै.औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून प्रगट निविदा मागविल्या असता एकूण सात निविदा विक्री झाल्या.पैकी पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.पी.एम.चोरडीया | १७.१७% जास्त |
| २) | श्री.पी.जे.तमखाने | २०% जास्त |
| ३) | श्री.मे.गुरुनानक इंडस्ट्रीज | २२% जास्त |

| | | |
|---|---|---|
| ४) | मे.रे.कंस्ट्रक्शन कं. | २२% जास्त |
| ५) | श्री.ए.सी.कोठारी | २३.२४% जास्त |

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.१७% जास्त दराची श्री.पी.एम.चोरडीया यांची निविदा आहे.सदरचे दर हे सन ९१-९२ च्या डि.एस.आर.दराने ठेकेदाराने दिलेले आहे.सन ९२-९३ च्या डि.एस.आर.शी तुलना केल्यास हेच दर ०.५८%जास्त येतात.

करीता श्री.पी.एम.चोरडीया यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.१७% जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव व वाढीव रक्कमेस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा ते टिळकनगर पर्यंत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी श्री.पी.एम.चोरउीया यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.१७% जास्त दराची निविदा स्विकारणेस व होणाऱ्या वाढीव खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४८/१० :**

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९२-९३ साली बीफ पुरवठा करीता (प्राणी संग्रहालय) मंजुर झालेले भाव रुपये १०.५०% श्री.शेख छोटे शेख चांद याचे आहे.

सदर निविदा धारकांनी अर्ज करुन विनंती केली आहे की,सन ९२-९३ चे भावात सन १९९३-९४ सालासाठी त्याच भावाने बीफ पुरवठा करण्यास तयार आहे.

त्यावर मा.महापौर व मा.सभापती यांनी त्याच दरावर देण्याची शिफारस केली आहे.

तरी पुन्हा निविदा मागवणे किंवा त्याच निविदाधारकास द्यावे याबद्दल प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**-:ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र.५४९/११ :**

सदस्य आ.श्री.चंद्रकांत खैरे यांनी त्यांचे पत्र क्र.७१५०/आकासं/गाऊहोबा/९३ दि.२५-२-९३अन्वये मुंबईहून प्रकाशीत होणाऱ्या ऐ.सामना या वर्तमानपत्राच्या विभागीय कार्यालयासाठी औरंगपुरा येथील नाथ सुपर मार्केट मधील गाळा दै.सामनाच्या विभागीय कार्यालयासाठी भाडयाने देण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबईहून प्रकाशीत होणाऱ्या "दैनिक सामना" या वर्तमानपत्राच्या विभागीय कार्यालयासाठी औरंगपुरा स्थित नाथ सुपर मार्केट गाळा "प्रबोधन प्रकाशन विश्वस्त संस्था,मुंबई" या नावाने भाडयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.सदरील गाळयाचा भाडे दर सहा.संचालक नगररचना यांचेमार्फत ठरवुन नियम व अटीसह पुढील सभेत प्रस्ताव ठेवण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५०/१२ :**

सचीव मराठवाडा टॅक्सी मेटॅडोर व जीप ओनर्स असोशिएशन औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र दिनांक १-३-९३ नुसार विनंती केली आहे की,मुख्य बसस्थानकाच्या शेजारी सिध्दार्थ

गार्डनच्या कुंपण भिंतीला लगत टॅक्सी,मेटॅडोर व जीप या वाहनांचा स्टॅन्ड २० वर्षापासुन अस्तित्वात आहे.

सध्या टॅक्सी, गाडयांची संख्या वाढल्याने व तसेच सिध्दार्थ गार्डनच्या समोर फुटपाथ व रेलींग बांधल्याने या गाडयांना रोडवर उभे करावे लागत आहे व यामुळे ट्राफिकमध्ये अढथळा निर्माण होत आहे.तरी ज्या ठिकाणी सध्या टॅक्सी मेटॅडोर व जीप उभे राहत आहेत.त्याच्या पाठीमागे सिध्दार्थ गार्डनमधील रोडलगत डी.पी.(विद्युत मंडळाची) आणि श्री.भडके उद्यान अधिक्षक यांचे कार्यालया मधील विना उपयोगी ५५ x ४५ ची मोकळी जागा प्रतिवर्ष ११००/- रुपये भाडेपट्टयाने ३० वर्षासाठी असोशिएशनच्या नावाने देण्यात यावी.

तरी सदरील जागा मराठवाडा टॅक्सी मेटॅडोर व जीप ओनर्स असोशिएशनला भाडे पट्टयात देण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ गार्डनमधील रोड लगत डी.पी.(विद्युत) व श्री.भडके,गार्डन अधिक्षक यांचे ऑफिस यामधील रिकामी ५५x४५ ची जागा "मराठवाडा टॅक्सी मेटॅडोर व जीप ओनर्स असोसीएशन,औरंगाबाद" या नावाने भाडे पट्टयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.सदरील जागेचा भाडे दर सहाय्यक संचालक नगररचना यांचे मार्फत ठरवून नियम व अटीसह पुढील सभेत प्रस्ताव ठेवण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५१/१३ :**

महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील झोन क्र.४ मध्ये काम करणारे चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री.कडूबा भागाजी पारखे यांनी दि.१-३-९३ रोजी अर्ज देवून विनंती केली आहे की, त्यांचे महानगरपालिका हद्दीत स्वत:चे घर नाही. दशमेशनगर येथे प्लॉट क्र.५१ व ५२ मध्ये रस्त्याकरीता म्हणून सोडलेली खुली जागा आहे. या जागेच्या उत्तर बाजुने नाला असल्याने तसेच दुसऱ्या ले-आऊट मध्ये हा रस्ता पुढे नसल्याने हा रस्ता मुळीच वापरला जात नाही. तेव्हा सदरील जागा ९९ वर्षाच्या भाडे करारावर देण्यात यावी. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या पाणी पुरवठा विभागातील झोनक्र.४ मध्ये काम करणारे चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री.कडूबा भागाजी पारखे यांना दशमेशनगर येथील प्लॉट क्र.५१ व ५२ मध्ये रस्त्याकरीता म्हणून सोडलेली खुली जागा वापरात नसल्यामुळे भाडे करारावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरील जागा भाडेतत्वावर देण्याबाबत नियम व अटीसह तसेच या जागेचे भाडे दर सहाय्यक संचालक नगररचना यांचे मार्फत ठरवुन पुढील सभेत प्रस्ताव ठेवण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५२/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पडेगांव कत्तलखाना येथे गट क्र.६६ व ६७ साठी पाणी पुरवठयाची व्यवस्था करण्यासाठी जलवाहीनी टाकण्याचे कामाकरीता रक्कम रु.६,५५,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान सन १९९०-९१ मधुन करण्यात येईल.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.४८/९२-९३ जी की,दैनिक मराठवाडा,रहेवर सकाळ या वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या

असता एकूण सहा कोऱ्या निविदा विक्री झाल्या.पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.आर.एस.धाडीवाल | ११.७०% जास्त |
| २) | श्री.जी.एम.कटारीया | ५.३% जास्त |
| ३) | श्री.अमदेसी जेठा राठोड | ८.००% जास्त |

प्राप्त निविदापैंकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.३% जास्त दराची निविदा श्री.जी.एम.कटारीया यांची आहे. परंतु सदरील दर जास्त असल्यामुळे मा.आयुक्तांच्या दालनात दि.१६-३-९३ रोजी वाटाघाटी करण्यात आल्या असता मा.आयुक्तांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दरास मान्यता दिलेली आहे. तरी वाटाघाटी अंती ठरलेल्या दराने श्री.जी.एम.कटारीया यांची ४% जास्त दराची निविदा स्विकृती बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पडेगांव कत्तलखाना येथे गट क्र.६६ व ६७ साठी पाणी पुरवठयाची व्यवस्था करण्याकरीता जलवाहीनी टाकण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैंकी गुत्तेदार श्री.जी.एम.कटारीया यांच्याशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या कामास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५३/१५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केली की, महानगरपालिकेच्या हद्दीतील विविध जलकुंभावर डयुटीरुम बांधावयाच्या आहेत. सदर कामाकरीता रक्कम रु.४,९९,४००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.२६४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर काम हाती घेण्याकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र.४८/९२-९३ जी की,दै.लोकमत टाईम्स व सिटीजन्स या वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन कोऱ्या निविदा विक्री झाल्या व त्या तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.शेख शरीफ | १४.२५% जास्त |
| २) | श्री.मो.अब्दुल लतिफ | १६% जास्त |
| ३) | श्री.मो.अब्दुल लतिफ | १६% जास्त |
| ४) | मे.जाधव कन्स्ट्रक्शनकंपनी | १७.७८% जास्त |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.२५% जास्त दराची श्री.शेख यांची निविदा आहे.परंतु सदरील दर जास्त वाटत असल्यामुळे दि.१६-३-९३ रोजी मा.आयुक्तांच्या दालनात झालेल्या वाटाघाटीअंती गुत्तेदाराने १४.२५% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली आहे.या दरास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या हद्दीतील विविध जलकुंभावर डयुटीरुम बांधण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दर असलेल्या निविदाधारक श्री.,शेख शरीफ यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम

अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५४/१६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९२-९३ या वित्तीय वर्षासाठी पाणी पुरवठा विभागासाठी किर्लोस्कर कंपनीचे स्लुस व्हॉल्वज खरेदी करण्यासाठी कार्यालयाने निविदा क्र.मनपा/पापु-१/भांडार/६७/९३ दि.११/१/९३ अन्वये जाहिर निविदा मागविण्यात आल्या.सदरील निविदा दै.अजिंठा,मराठवाडा व औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली.त्यानुसार एकूण तीन कोऱ्या निविदा विक्री झाल्या व त्या तीनही दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्यांचे दर खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.पी.जे.सजनानी | ५७.०६% जास्त |
| २) | इलेकमेक (इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर) | ४३.२३% जास्त |
| ३) | किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड | ५६.१५% जास्त |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४३.२३% जास्त दराची मे.इलोकमेक इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर यांची रक्कम रु.६,७९,००८/- ची निविदा आहे.

कार्यालयीन प.क्र.मनपा/पापु-१/३७१/९३ दि.२५-२-९३ अन्वये इलोकमेक इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर यांना पत्रक देवून वाटाघाटी साठी मा.आयुक्तांच्या दालनात बोलावले असता दि.४-३-९३ रोजी वाटाघाटी होवुन उपरोक्त दर कमी करून नविन अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्त दराने मालाचा पुरवठा करण्याचे इलोकमेक इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर यांनी मान्य केले आहे.म्हणजेच निविदा दरापेक्षा ३५.०६% जास्त दराने मंजुरीस्तव सादर.सदरील दर परिसर अभियांत्रिकी विभागाच्या यांत्रिकी दरसुची नुसार ५२.२३% कमी येतात.तरी अंदाजपत्रकीय दरोपक्षा ३५.०६% जास्त दराने किर्लोस्कर कंपनीचे क्लास व्हॉल्व टेलपीससह पुरवठा करण्याकरीता इलेकमेक इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर यांच्या निविदा दरास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ या वित्तीय वर्षासाठी पाणी पुरवठा विभागासाठी किर्लोस्कर कंपनीचे स्लुस व्हॉल्व खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दर असलेले निविदाधारक मे.इलेमेक इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर यांच्याशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.०६% जास्त दराने किर्लोस्कर कंपनीचे स्लुस व्हॉल्व टेलपीस सह खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या कामास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५५/१७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील विविध भागातील विहिरींवर व विंधन विहिरीवर पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्याचे (स्टरफील स्टरीलायझर) संयंत्र खरेदी करुन बसविणे आहे.सदरचे संयंत्र हे मे.म्हात्रे यांनी दिलेल्या दरानुसार अंदाजपत्रक रक्कम रु.४,९५,०००/- एवढयाचे तयार करण्यात आलेले असुन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.संयंत्र खरेदीचा तपशील खालीलप्रमाणेचा आहे.

| अ.क्र. | तपशील | | दर |
|---|---|---|---|
| १ | २०,००० लिटर्स क्षमतेचे अल्ट्राव्हायलट रेस टयुब नं.५,३० वॅट २ १/२"व्यासाचे | ८ नग | रु.५२,००० प्रति नग |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | ३०,००० लिटर्स क्षमतेचे अल्ट्राव्हायलट रेस टयुब नं.६,३० वॅट ३" व्यासाचे | १ नग | रु.७८,५००/- प्रति नग |

वरीलप्रमाणेचे संयंत्र हे मे.म्हात्रे इंडस्ट्रीज वडोदा यांचेतर्फे खरेदी करण्यास व त्यासाठी येणारा खर्च रक्कम रु. ४,९४,५००/- च्या खर्चास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध भागातील विहिरीवर व विंधन विहिरीवर पाण्याचे निर्जतुकीकरण करण्याचे कामासाठी लागणारे (स्टरफील स्टरीलायझर) हे संयंत्र मे.म्हात्रे इंडस्ट्रीज बडोदा यांचेकडून खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रु.४,९४,५००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.संयंत्राचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | | दर |
|---|---|---|---|
| १ | २०,००० लिटर्स क्षमतेचे अल्ट्राव्हायलट रेस टयुब नं.५,३० वॅट २ १/२"व्यासाचे | ८ नग | रु.५२,००० प्रति नग |
| २ | ३०,००० लिटर्स क्षमतेचे अल्ट्राव्हायलट रेस टयुब नं.६,३० वॅट ३" व्यासाचे | १ नग | रु.७८,५००/- प्रति नग |

सदरील ठरावास याचे सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५६/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विद्यानगर अंतर्गत खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सन ९१-९२ च्या सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु.३,५८,४२०/- च्या अंदाजपत्रकास दिनांक ३१/१२/९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असुन सदरचा खर्च "शासकीय अनुदान सन ९१-९२" या सदराखाली करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/बां-२/१५४/९३ दि.२४-२-९३ अन्वये दै.महाराष्ट्र टाईम्स व दै.सकाळ या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विक्री झाल्या व त्या तीनही निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.शेख शरीफ | ९.९९% जास्त |
| २) | श्री.एम.एस.जाधव | १२% जास्त |
| ३) | श्री.एम.ए.लतिफ | १५% जास्त |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९.९९% जास्त दराची श्री.शेख शरीफ यांची निविदा आहे.सदरील कामासाठी सन ९२-९३ च्या डि.एस.आर.बरोबर तुलना केली असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दर येतात.

तरी श्री.शेख शरीफ यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९% जास्त दराच्या निविदेस व येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विद्यानगर अंतर्गत खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९९% जास्त दराच्या श्री.शेख शरीफ यांची निविदा स्विकारणेस तसेच वाढीव खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.त्याचप्रमाणे या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही हावी.

**विषय क्र.५५७/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा एम.आय.डी.सी.येथील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९१-९२ चे सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु.२०,००,०००/- च्या अंदाजपत्रकास दिनांक १८-१२-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असुन सदरचा खर्च शासकीय अनुदान सन १९९२-९३ या सदराखाली करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/१५४/९३ दि.२४-२-९३ द्वारे दैनिक महाराष्ट्र टाईम्स व दै.सकाळ या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता दोन निविदांची विक्री झाली व त्या दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे.

१) श्री.डी.एस.जग्गी १६.९०% जास्त दराने
२) श्री.एम.एस.जग्गी २०% जास्त दराने

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९०% जास्त दराची श्री.डी.एस.जग्गी यांची निविदा आहे.सदरील कामासाठी सन १९९२-९३ च्या डि.एस.आर.दरा बरोबर तुलना केली असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.१६% जास्त दराने निविदेचे दर येतात.

तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९०% जास्त दराची श्री.डी.एस.जग्गी यांची निविदा स्विकारणेस व येणाऱ्या वाढीव रक्कमेस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा एम.आय.डी.सी.येथील अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९०% जास्त दराची श्री.डी.एस.जग्गी यांची निविदा स्विकारणेस व त्यानुसार येणाऱ्या वाढीव रकमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच या कामास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५८/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बुध्दवाडा,शिवशंकर कॉलनी येथील रोडचे खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रु.४,००,३००/- चे अंदाजपत्रकास दि.९-१-९३ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असुन सदरचा खर्च "शासकीय अनुदान १९९२-९३" या शिर्षकाखाली करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.मनपा/१५४/९३ दि.२४-३-९३ द्वारे दै.महाराष्ट्र टाईम्स व दै.सकाळ या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा विक्री झाल्या व त्या दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्या खालीप्रमाणे.

१) श्री.ए.सी.कोठारी २०.५% जास्त दराने
२) श्री.जी.एम.कटारीया २१% जास्त दराने

तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.५% जास्त दराची श्री.ए.सी.कोठारी यांची निविदा आहे.सदरील कामासाठी सन ९२-९३ च्या डी.एस.आर.दराबरोबर तुलना केली असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.०९% जास्त दर येतात.

तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.५% जासत दराची श्री.ए.सी.कोठारी यांची निविदा स्विकारणेस व त्यानुसार येणाऱ्या वाढीव रक्कमेस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे, बुध्दवाडा,शिवशंकर कॉलनी येथील रोडचे खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.५% जास्त दराची श्री.ए.सी.कोठारी यांची निविदा स्विकारणेस व त्यानुसार येणाऱ्या वाढीव रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५५९/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.आरीफ हौसींग सोसायटीमधील मनपाच्या खुल्या जागेस रिटेनिंग वाल व तार कुंपन करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.३०१ दिनांक १७-१०-९२ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

त्या अनुषंगाने सदर कामासाठी बी-१ नमुन्यात निविदा सुचना क्र.९२-९३ पत्र क्र. ७९२/९२ दि.२-१२-९२ द्वारे दैनिक मराठवाडा,सकाळ व औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण २१ कोऱ्या निविदा विक्री झाल्या.पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्यांचे दर खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.एस.पी.सरवदे | ४.९५% जास्त |
| २) | एस.एच.असोशिएटस | ७% जास्त |
| ३) | श्री.कुलवंतसिंग | ९% जास्त |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५% जास्त दराची श्री.एस.पी.सरवदे यांची निविदा आहे.मा.आयुक्तांच्या आदेशानुसार संबंधित गुत्तेदारास दराचे वाटाघाटीसाठी बोलावले असता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५% जास्त दराऐवजी ३% जास्त दराने काम करण्यास सम्मती दर्शविली आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.आरीफ हौसींग सोसायटी मधील मनपाच्या खुल्या जागेस रिटेनिंग वॉल व तार कुंपन करणेच्या कामासाठी गुत्तेदार श्री.एस.पी.सरवदे यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच या कामास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६०/२२ :**

मालमत्ता अधिकारी, मा.आयुक्त यांचे मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहे की,कार्यालयाने नगर परिषद काळापासुन खालील मिळकत धारकांना त्यांच्या क्रांतीचौक येथील सॉ मील मिळकतीच्या मागील महानगरपालिकेची मोकळी जागा भाडेपट्टयाने दिलेली आहे.या भाडेपट्टयाचे नुतनीकरण सन १९८५ साली तीन वर्षासाठी करण्यात आले होते.त्याची मुदत सन १९८८ साली संपलेली आहे.आता या भाडेपट्टयाचे नुतनीकरण पुढील काळासाठी करण्याचा प्रस्ताव आहे.

या मिळकतीपासुन कार्यालयास प्राप्त होत असलेले भाडे उत्पन्न अत्यंत कमी असल्या कारणाने व कार्यालयाचे उत्पन्नात वाढ करण्याचे दृष्टीने सुधारीत भाडयाचे आकारणी सहाय्यक संचालक नगर रचना यांचेकडून ठरवुन घेण्यात आलेले आहे.

भाडेपट्टा धारकाचे नांव जमिनीचे क्षेत्रफळ तसेच प्रस्तावित सुधारीत भाडे ---- आकारणी प्रमाणे मासीक व वार्षीक भाडे आकारणी खालील दर्शविल्याप्रमाणे आहे.

| अ. क्र. | न.भु.क. | नांव | एकूण क्षेत्र चौ.मी. | प्रस्तावित भाडे आकारणी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वार्षीक भाडे | मासीक भाडे |
| १ | १४५१५/भाग | हरविंदरसिंग रघुविरसिंग निन्हृ | ५५१ | १२,३४३ | १०३० |
| २ | १४५२४/ भाग | करसन भानजी पटेल | २९६२ | ६६,३५० | ५५३० |
| ३ | १५५२६/भाग | लालादास पन्नालाल शहा | ११३१ | २५,३३५ | २११० |
| ४ | १४५१५/भाग | देवेंद्रसिंग जग्गी | ७०७.५० | १५,८५० | १३२० |
| ५ | १४८१२/ भाग | कल्याणजी भाई जिवाभाई भारदिया | ६३५.५० | १४,२३५ | ११८६ |

वरील भाडेपट्टाधारकांचा भाडेपट्टा १९८८-८९ ते ९०-९१ साठी कार्योत्तर नुतनीकरण करणेबाबत तसेच वर प्रस्तावित केल्याप्रमाणे सुधारीत भाडे (लिज) आकारणी करणेबाबत विचार होवून निर्णय होणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीचौक येथील सॉ मिल मिळकतीच्या मागील महानगरपालिकेची मोकळी जागा ज्या भाडेपट्टा धारकांना भाडेपट्टयावर दिलेली आहे.त्यांचा भाडेपट्टा सन १९८८-८९ ते ९०-९१ साठी कार्योत्तर नुतनीकरण करणेस तसेच खालील प्रमाणे प्रस्तावित केलेल्या सुधारीत भाडे (लिज) रक्कम आकारणी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | न.भु.क. | नांव | एकूण क्षेत्र चौ.मी. | प्रस्तावित भाडे आकारणी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वार्षीक भाडे | मासीक भाडे |
| १ | १४५१५/भाग | हरविंदरसिंग रघुविरसिंग निन्हृ | ५५१ | १२,३४३ | १०३० |
| २ | १४५२४/ भाग | करसन भानजी पटेल | २९६२ | ६६,३५० | ५५३० |
| ३ | १५५२६/भाग | लालादास पन्नालाल शहा | ११३१ | २५,३३५ | २११० |
| ४ | १४५१५/भाग | देवेंद्रसिंग जग्गी | ७०७.५० | १५,८५० | १३२० |
| ५ | १४८१२/ भाग | कल्याणजी भाई जिवाभाई भारदिया | ६३५.५० | १४,२३५ | ११८६ |

सदरील ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापतींनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ३-४-१९९३ रोजी भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. शनिवार दिनांक ३-४-९३ रोजी दुपारी ३=४० वाजता समिती सभागृहात मा.सभापती ॲड.श्री.इगबालसिंग गिल यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस समिती सभागृहात सुरुवात झाली.**

**या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१) मा.श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
२) मा.श्री. भगुरे तुळशिराम छगन
३) मा.श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग
४) मा.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
५) मा.श्री. जावेद हसनखान कासीम हसनखान
६) मा.श्री.अजिजुल्ला बेग वाहेद बेग
७) मा.श्री.पेरकर विठ्ठल कोंडाजी.
८) मा.श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव.

**विषय क्र.५६१/१ :**

दिनांक ११-२-९३ व १६-३-९३ व १९-३-९३ च्या स्थायी समिती व विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.तुळशिराम भगुरे :** मनपा चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यासाठी हर्सुल येथे बांधण्यात आलेल्या कर्मचाऱ्याच्या निवासस्थानांना सार्वजनिक दिव्याची व्यवस्था किती दिवसात केली जाईल याचा खुलासा व्हावा.

**अति.शहर अभियंता :** हर्सुल येथे मनपा कर्मचाऱ्याच्या निवास स्थानासाठी एक रोड आहे.यावर किमान आठ दहा पोल बसवावे लागतील.यासाठी आवश्यक ते प्रयत्न चालु आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** सार्वजनिक दिवाबत्तीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे पुरविण्यात येणारे लाईनमन देण्याचे काम गेल्या एक महिन्यापासुन मंडळाने बंद केले आहे.त्यामुळे सार्वजनिक दिवाबत्तीच्या तक्रारी वाढल्या आहेत.महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या मदतीशिवाय स्ट्रिट लाईटचे काम आपण करु शकतो.तेव्हा प्रशासनाने यावर विचार करावा.सार्वजनिक दिवाबत्तीसाठी उभारावयाच्या पोल करीता मनपाला प्रतिनग रुपये ३५००/- या प्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास खर्च दयावा लागतो.याउलट सार्वजनिक दिवाबत्तीसाठी लागणारे पोल मनपा तर्फे उभरण्यास रूपये ३०००/- खर्च येतो.मनपाने उभारलेल्या अशा पोलवर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ लाईन ओढण्यास तयार आहे.

**अति.शहर अभियंता :** स.सभासदाच्या सुचनेप्रमाणे सार्वजनिक दिवाबत्तीचे काम मनपा प्रशासनातर्फे करुन घेता येईल.परंतु त्यासाठी दिड ते दोन लाख रुपये खर्च वाढणार आहे.तसेच कर्मचारी वर्गही वाढवावा लागणार आहे.म.रा.वि.म.तर्फे

लाईनमन वेळेवर न मिळाल्यामुळे सार्वजनिक दिवाबत्तीच्या तक्रारी वाढत आहे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** म.रा.वि.म.मंडळातर्फे सार्वजनिक दिवाबत्तीच्या कामासाठी मंडळाचे लाईनमन मिळत नसल्या बाबत.प्रशासनातर्फे पाठपुरावा करण्यात आला आहे का?

**अतिरिक्त शहर अभियंता :** सार्वजनिक दिवाबत्तीच्या कामासाठी मंडळाचे लाईनमन पुरवठयाबाबत पाठपुरावा केला असता वसुलीचे काम होईपर्यंत थांबा असा खुलासा संबंधित अधिकाऱ्यांनी केला.

**श्री.विठ्ठल पेरकर :** सार्वजनिक दिवाबत्तीच्या तक्रारी लक्षात घेता या कामासाठी मंडळाचे लाईनमन पुरविण्याबाबत स्थायी समितीचे सभापती आणि सभासद यांनी म.रा.वि.मंडळाचे संबंधित अधिकारी यांच्याशी चर्चा करणे योग्य होईल.

**श्री.मधुकर शिंदे :** गेल्या दोन महिन्यापुर्वी कोकणवाडी येथील ८० फुट विकास रोडवरील अतिक्रमण काढण्यात आले होते.याठिकाणी व्यवसाय करणाऱ्यांना पर्यायी जागा दिली परंतु या ८० फुट विकास रस्त्यावर पुन्हा एक टपरी टाकण्यात आलेली आहे ती टपरी का काढण्यात आली नाही याचा खुलासा व्हावा.टपरी टाकण्यात

आलेली जागा ८० फुट रस्त्यासाठी आहे.दिवाळीच्या सणाच्या वेळी तीन सख्खे भाऊ आणि नजिकच्या काळात एका प्राध्यापकाचा याच ठिकाणी मृत्यु झाला आहे.या ठिकाणी असलेल्या टपऱ्यामध्ये अनेकांनी पोट भाडेकरु दिलेले आहे.तेव्हा सदर टपऱ्या पोट भाडेकरुंच्या नांवे करण्यात याव्यात.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** नियमाप्रमाणे पोट भाडेकरुच्या नांवे टपरी करता येईल काय याचा खुलासा व्हावा.

**विधी सल्लागार :** पोटभाडेकरु असलेल्या प्रकरणात नियमाप्रमाणे करार रद्द करण्याची अशी किती प्रकरणे आता पर्यंत झाली याचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** कोकणवाडी येथील ८० फुट रोडवरील ज्या टपऱ्या अनधिकृत आहे आणि त्यामुळे अडचण निर्माण होत असेल तर अशा टपऱ्या हटविण्यात याव्यात.

**मा.उप आयुक्त :** कोकणवाडी येथील ८० फुट रोडवरील पोटभाडेकरु असलेल्या अनधिकृत असलेल्या नियमाच्या विरुध्द असतील अशा सर्व टपऱ्या काढून टाकण्यात येतील.

**श्री.अजिजुल्ला बेग :** शासनाकडून मिळालेले ५.१० कोटीचे अनुदान कलम ९२ अन्वये कोणत्या बँकेत ठेवण्यात येणार आहे.या बाबत स्थायी समितीची मंजुरी घेतली आहे काय? याचा खुलासा व्हावा.

**मा.उप आयुक्त :** शासनाकडून मिळालेला ५.१० कोटी अनुदानाची रक्कम युनायटेड वेस्टन्र बँकेतील महापालिकेच्या खात्यात ठेवण्यात आलेली आहे.या रक्कमेपैकी काही रक्कम मुदतीच्या ठेवीमध्ये ठेवावयाची असेल तर स्थायी समितीच्या मंजुरीची गरज आहे.परंतु अशी रक्कम कोणत्या बँकेत गुंतवायची यासाठी स्थायी समितीच्या मंजुरीची गरज नाही.

**विधी सल्लागार :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८२ प्रमाणे शासकीय अनुदानाची रक्कम ज्या बँकेत मनपाच्या फंडात जमा करावे असा नियम आहे.आणि उक्त अधिनियमाच्या कलम ९२(२) अन्वये शिल्लक असलेली रक्कम स्थायी समितीच्या मंजुरीने राष्ट्रीयकृत बँकेत ठेवता येईल असा नियम आहे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** विकास कामासाठी वसुल झालेली रक्कम त्याच कामासाठी खर्च न झाल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.म्हणून नियमाप्रमाणे सर्व लेखाशिर्षकासाठी स्वतंत्र खाते असणे आवश्यक आहे.

**श्री.गिरजाराम हाळनोर,श्री.अजिजुल्ला बेग :** दंगलग्रस्त टपरीधारकांना मनपातर्फे दयावयाच्या रुपये २००० आर्थिक मदतीचा ठराव आहे.डिसेंबर मध्ये सभागृहाने मंजुर करुनही तो सर्व साधारण सभेमध्ये का ठेवण्यात आला नाही आणि सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेमसध्ये ठेवण्याचर जबाबदारी कोणाची आहे. या बाबत खुलासा व्हावा.

**सचिव :** स्थायी समितीने सर्वसाधारण सभेस शिफारस केलेले ठराव या विभागा मार्फत सर्वसाधारण सभेमध्ये ठेवले जातात. स.सभासदाने सुचविलेला ठराव नजर चुकीने राहीला असेल तर सदर प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्याची व्यवस्था करता येईल.

**श्री.अजिजुल्ला बेग :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६५ अन्वये तयार करण्यात आलेले विविध उपविधी सभागृहाच्या मंजुरीसाठी ठेवता येतील असा खुलासा दोन महिन्यापुर्वी विधी सल्लागार यांनी केला होता तेव्हा त्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**विधी सल्लागार :** कलम ४६५ अन्वये तयार करण्यात आलेले विविध उपविधीच्या टंकलेखनाचे काम चालु आहे.उक्त नियमाप्रमाणे ८/१० उपविधी तयार केलेले आहे. ते नियमाप्रमाणे सभागृहापुढे ठेवण्याची व्यवस्था करण्यात येईल.

**श्री.अजिजुल्ला बेग :** दि.१९-३-९३ च्या सभेतील ठराव क्रमांक ५४९ ते ५५१ अन्वये भाडयाने दयावयाच्या जागेबाबत जागेचे भाडे नियम व अटी यासह पुढील सभेत प्रस्ताव ठेवण्यात यावा अशी मंजुरी दिली असतांना त्याबाबतचे प्रस्ताव आजच्या सभेत ठेवण्यात आलेले नाही.त्याबाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** स.सभासदांच्या सुचनेप्रमाणे जागेचे भाडे आणि त्या संबंधिचे नियम व अटी याबाबतचे प्रस्ताव सहाय्यक संचालक नगररचना यांनी पुढील सभेत ठेवण्याची व्यवस्था करावी.

**श्री.जावेदहसन खान :** दि.३-४-९३ (३१-३-९३) च्या सभेची विषम पत्रिका आणि मागील सभेच्या इतिवृत्तांताच्या उर्दु प्रति मिळाल्या नाही म्हणून निषेध करण्यात येतो.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** दि.२-४-९३ च्या दै.नवा मराठा या वृत्तपत्रात सिध्दार्थ उद्यानासमोरील कामाबाबत जे वृत्त प्रसिध्द झाले आहे.त्याबाबतचा खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** स.सदस्याच्या मागणी प्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांनी आवश्यक तो खुलासा करावा.

**श्री.गिराजाराम हाळनोर,श्री.अजिजुल्ला बेग :** दि.१९-३-९३ च्या सभेत नेहरु रोजगार योजना आणि त्या संबंधित अधिकारी वर्ग यांचा बहिष्कार याबाबत ठराव क्र.५३८ मधील (पान क्र.३ व ४वर) जी चर्चा नोंदविण्यात आली आहे. त्यापैकी खालील वाक्य व परिच्छेद वगळण्यात यावेत.

१) फत्तेलष्कर यांचे "सदरील प्रकरणात जातीयवाद आहे?

२) जोपर्यंत नेहरु रोजगार योजनेची संपुर्ण माहिती मिळत नाही तोपर्यंत सभा तहकुब करावी.कारण येथे जातीवादी राजकारण चालत

आहे.जोपर्यंत अधिकाऱ्यांना केसेस मागे पैसे दिले जात नाही तो पर्यंत कर्ज मंजुर होत नाहीत.पैसे दिले कि कर्ज मंजुर होतात.

३) उप आयुक्त यांचे "स.नगरसेवकांनी प्रशासनाला वेडे वाकडे व आपमान कारक शब्द वापरले म्हणून आम्ही सर्व अधिकारी ०५ मिनिटे सभात्याग करत आहोत. ४.२५ वाजता.

४) सहाय्यक आयुक्त यांचे "०.०५ मिनिटांनी महानगरपालिका ऑफिसर असोशिएशनचे अध्यक्ष यांनी सभेवर सर्व ऑफिसरनी बहिष्कार टाकला.

५) सभापती यांचे "अधिकारी वर्गानी सभेवर बहिष्कार टाकला आहे तरी याची चर्चा पुढील सभेत ठेवावी?

६) अजिजुल्ला बेग व इतर यांचे "मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४३(३) अन्वये फर्मानकडून संबंधित अधिकाऱ्यांना बोलवावे.त्याप्रमाणे सहाय्यक आयुक्त-१ यांना बोलावण्यात आले परंतु ते १५ ते २० मिनिटापर्यंत आले नाहीत.

७) श्री.अजिजुल्ला बेग यांचे मनपा अधिनियम १९४९ चे कलम (३) अन्वये संबंधित अधिकाऱ्याला बोलावुनही हजर झाले नाही.त्यासाठी सभागृहाचा अर्धातास बोलावण्यात वाया गेला म्हणून मनपा अधिनियम १९९४ चे कलम ५६ अन्वये संबंधितास निलंबित कार करण्यात येवू नये.म्हणून कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी. ही वाक्ये व पुर्ण परिच्छेद वगळून टाकण्यात यावे.

**मा.सभापती :** स.सभासदांच्या सुचनेप्रमाणे दि.१९-३-९३ च्या सभेतील अनु.१ ते ७ पर्यंतचे वाक्य व पुर्ण परिच्छेद वगळून टाकण्यात यावे.

**श्री.गिरजाराम हाळनोर,श्री.अजिजुल्ला बेग :** दि.१९-३-९३ च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेल्या ठराव क्र.५४८ च्या प्रस्तावित कामासाठी शॉर्ट टेंडर नोटीस वगळण्यात यावी आणि जोपर्यंत जुन्या गुत्तेदाराकडून मागील दराने माल खरेदी करण्यात यावा.

**मा.सभापती :** स.सभासदाच्या सुचनेप्रमाणे ठराव क्र.५४८ च्या कामासाठी शॉर्ट टेंडर नोटीसचे का फायनल होईपर्यंत जुन्या गुत्तेदाराकडून मागील दराने माल घेण्यात यावा.

सदर प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.तसेच दिनांक १६-३-९३ ची सभा विशेष सभेऐवजी उप समितीची सभा अशी नोंद करण्यात यावी.

**श्री.अजिजुल्ला बेग,श्री.मधुकर शिंदे,श्री.जावेदहसनखान,श्री.गिरजाराम हाळनोर :** दि.१९-३-९३ च्या सभेत क्रांतीचौक येथील महापालिकेच्या मोकळया जागेबाबतच्या प्रस्तावात स्थगिती दिली असतांना ही इतिवृत्तामध्ये सदर प्रस्ताव मंजुर असल्याची नोंद करण्यात आली आहे. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**श्री.विठ्ठल पेरकर :** मागील मिटींग मधील विषय क्र.५६०/२२ हा विषय पुढील बैठकीमध्ये चर्चेला घेऊ असे ठरले असता तो मिनिटमध्ये मंजुर झाला व त्याला स्विकृती सुध्दा दिली असे झाले आहे. ते कसे झाले.

**सचिव :** ते चुक झाले असुन त्याची दुरुस्ती करण्यात येते व तो विषय आजच्या मिटींग पुढे ठेवण्यात येतो.

**श्री.जावेद हसनखान :** मागच्या मिटींगमध्ये आपण औरंगाबाद शहरामधील विविध मनपाच्या दुकानाचे भाडे टि.पी.विभागाच्या आकरणी नुसार वाढविले होते. परंतु त्या दुकान दारानी पैसे भरण्यास असमर्थता दाखविली व त्यांना वाटाघाटीसाठी बोलवावे लागले होते. त्याच आधारावर सदरील भाडेकरु भाडे भरणार नाही

म्हणून यांना पण त्याचप्रमाणे पुर्वीच्या पेक्षा भाडेपेक्षा १५/२०% वाढवुन भाडे आकारुन भरण्यास सांगावे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** पुर्वी जालना रोडवरील ज्यांना जागा लिसवर देण्यात आले आहे.त्यांच्याकडून आपण पुर्वी काय भाडे घेत होतो.

**मा.सभापती :** प्रस्तावित जागेबाबत संबंधित विभागाचे वरील लिपिकाचे जुन्या भाडे बाबत माहिती घेतली असता प्रस्तावित अनुक्रमांक १ ते ५ करीता पुढीलप्रमाणे अनुक्रमे वार्षीक भाडे आकारण्यात येते अशी माहिती मिळाली आहे. वार्षीक भाडे अनुक्रमे पुढीलप्रमाणे रुपये ६७२/-,रुपये ३,३४४/-,रुपये २,२५६/-,रुपये ९३४=८८ आणि रुपये ६३९=८० पैसे ऐणे प्रमाणे.

**श्री.जावेद हसनखान :** ते जागा तेथील लोकांकडे किती वर्षापासुन आहे.

**मा.आयुक्त :** जवळ जवळ तीस वर्षापासुन.

**श्री.अजिजुल्ला बेग :** ठरावामध्ये नमुद केले आहे की,१९८८ ते आतापर्यंतच्या भाडे पट्टीस (सुधारीत) कामौत्तर मंजुरी देण्यात यावी. आम्ही आज पर्यंतच्या भाडयापुर्वी ठरवून दिल्याप्रमाणे वसुल करण्यात यावा.

**श्री.अजिम बेग :** सदरील लिस ज्यांना दिली आहे ते यापुर्वी कोर्टात गेले होते.

**मा.सभापती :** नगरपालिका असतांना ते कोर्टात गेले होते. परंतु तेंव्हा नगराध्यक्षांनी त्यांना कोर्टामध्ये केस मागे घेण्यास विनंती केली होती व त्याप्रमाणे केस मागे घेण्यात आली व त्यांना मालमत्ता शुल्का आकारुन लिस करुन देण्यात आली होती.

**श्री.अजिजुल्ला बेग :** वारंवार लिस करण्यापेक्षा त्यांना एकावन्न वर्षांची लिस करुन देण्यात यावे.

**श्री.अजिम बेग :** मागे श्री.न्याते साहेबांनी त्यांना लिस वाढवून दिली होती.तसा अधिकार त्यांना नव्हता तरी पण त्यांनी लिस करुन दिली ते योग्य नसून त्यांना वारंवार लिस करुन दिली ते देण्यापेक्षा एकदाच एकावन्न वर्षाची लिस करून देण्यात यावी.

**श्री.विठ्ठल पेरकर :** सभापती साहेब आपण मनपाच्या दुकानांच्या भाडे पुर्वी वाढविला होता, परंतु नंतर आपण नाईलाजाने भाडे कमी करुन द्यावा लागला व ती दुकाने आपण बांधुन दिलेली आहेत आणि वरील ठरावाची जागा ही मोकळी असुन त्यांना आकारण्यात आलेले भाडे अत्यंत जास्त वाटतात. तसे त्यांना आपण ज्या प्रमाणे दुकान २०/२५% पुर्वीच्या भाडयापेक्षा वाढवून दिले आहे. त्याप्रमाणे २०% पुर्वीच्या भाडयापेक्षा वाढवून देवून पुढील १० वर्षाचे भाडे एकत्रित भरण्यास सांगावे.

**मा.सभापती :** सर्व सन्माननीय सदस्यांच्या चर्चा ऐकूण निर्णय करण्यात येतो. जालना रोडवरील जे भाडेकरु आहेत ते तेथे मागील ३० वर्षापासुन आहेत. त्यांच्याकडील मागील थकीत १९९३ पर्यंतचे भाडे पुर्वीच्या दराने वसुल करण्यात यावे व त्यांना पुढील ३१ वर्षाची लिस करुन देण्यात यावी तसेच त्यांना सुधारीत भाडे म्हणजे त्यांच्या पुर्वीच्या भाडयापेक्षा २५% जास्त भाडे वाढवून त्यांच्या कडुन पुढील १० वर्षाचे भाडे एकत्रित भरुन घेण्यात यावे. सदरील ठरावास हयाच सभेत स्विकृती देण्यात येते.

**ठराव :**

१) दिनांक १६-३-९३ रोजी संपन्न झालेल्या सभेचे विशेष स्थायी समिती सभा या ऐवजी उप समितीची सभा अशी दुरुस्ती करण्यात यावी.

२) तसेच दिनांक १९-३-९३ च्या सभेत खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात येतात.

अ) ठराव क्र.५३९ मधील (पान क्र.३ व ४ मधील) खालील वाक्य व परिच्छेद वगळण्यात येतात.

१) स.सदस्य श्री.नारायण फत्तेलष्कर यांचे "सदरील प्रकरणामध्ये जातियवाद आहे."

ब) "जोपर्यंत नेहरु रोजगार योजनेची संपुर्ण माहिती मिळत नाही तोपर्यंत सभा तहकुब करावी कारण येथे जातीवादी राजकारण चालत आहे.जोपर्यंत अधिकाऱ्यांना केसेस मागे पेसे दिले जात नाही तोपर्यंत कर्ज मंजुर होत नाहीत.पैसे दिले का? कर्ज मंजुर होता."

क) "स.नगरसेवकांनी प्रशासनाला वेडेवाकडे व अपमानकारक शब्द वापरले म्हणून आम्ही सर्व अधिकारी ०५ मिनिट सभात्याग करत आहेत. ४.२५ वाजता."

ड) "०.०५ मिनिटांनी महानगरपालिका ऑफीसर असोशिएनचे अध्यक्ष यांनी सभेवर सर्व ऑफीसरनी बहिष्कार टाकला."

इ) "अधिकारी वर्गानी सभेवर बहिष्कार टाकला आहे तरी याची पुढील सभेत चर्चा ठेवावी."

ई) "मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४३(३) अन्वये फर्मानकाढून संबंधित अधिकाऱ्यांना बोलावले.त्याप्रमाणे सहाय्यक आयुक्त-१ यांना बोलावण्यात आले परंतु ते १५ ते २० मिनिटापर्यंत आले नाहीत.

ए) "मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४३(३) अन्वये संबंधित अधिकाऱ्याला बोलावुनही हजर झाले नाहीत त्यासाठी सभागृहाचा अर्धा तास बोलावण्यात वाया गेला म्हणून मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये संबंधितास निलंबित का करण्यात येवू नये म्हणून कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी."

२) स्थगित ठेवण्यात आलेला ठराव क्र.५४८ करीता शॉर्ट टेंडर नोटीसचे काम फायनल होईपर्यंत जुन्या गुत्तेदाराकडून मागील दराने माल घेण्यात यावा. सदरील प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

३) ठराव क्र.५६०/ दि.१९-३-९३ अन्वये झालेल्या निर्णया ऐवजी जालना रोडवरील जे भाडेकरु आहेत ते तेथे मागील ३० वर्षापासुन आहेत.त्यांच्याकडील मागील थकीत १९९३ पर्यंतचे भाडे पुर्वीच्या दराने वसुल करण्यात यावे व त्यांना पुढील ३१ वर्षाची लिस करुन देण्यात यावी. तसेच त्यांना सुधारीत भाडे म्हणून त्यांच्या पुर्वीच्या भाडयापेक्षा २५% जास्त भाडे वाढवून त्यांच्याकडुन पुढील १० वर्षाचे भाडे एकत्रित भरुन घेण्यात यावे. सदरील ठरावात हयाच सभेत स्विकृती देण्यात येते.

दिनांक १६-३-९३ व १९-३-९३ च्या सभेकरीता वर दर्शविलेल्या प्रमाणे आवश्यक ती दुरुस्ती व वाद यासह दिनांक ११-२-९२,१६-३-९३ आणि १९-३-९३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५६२/२ :**

मा.शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.लेबर कॉलनी येथे अस्तित्वात असलेल्या समाज मंदिराचे नुतनीकरण करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९१-९२ चे डि.एस.आर.दराने रक्कम रु. ३,९०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु. ३,९०,०००/- मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.अजिजुल्ला बेग, श्री.गिरजाराम हाळनोर :** प्रस्तावित कामाचा खर्च कोणत्या लेखाशिर्षकातून करण्यात येणार आहे.तसेच ५.१० कोटीच्या शासकीय

अनुदानातुन कोणकोणती कामे हाती घेण्यात येणार आहे व त्यात काय बदल करण्यात येणार आहे,याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता (इमारती) :** प्रस्तावित कामाचा खर्च भांडवली ईमारती या लेखाशिर्षकातुन करण्यात येईल.

**मा.सभापती :** ५.१० कोटीच्या शासकीय अनुदानातुन हाती घ्यावयाच्या कामा बाबतची माहीती पुढील सभेत देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लेबर कॉलनी येथे समाजमंदिराचे नुतनीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रु.३,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**:-ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र.५६३/३ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,गुलशन महल ते चंपा मस्जीद १००'डी.पी.या रस्त्याच्या डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९१-९२ दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रु.३,४२,६५५/-चे बनविण्यात आले असुन यास प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.सदरील कामाचा समावेश शासकीय अनुदानात केलेला आहे.

या कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विकल्या गेल्या व त्यापैकी एकच निविदा दर भरुन प्राप्त झाली.त्या दिनांक २६-३-९३ रोजी उघडण्यात आल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.खाजा अमिनुद्दीन     १८.८६%     अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त

सदरील दर लक्षात घेता नवीन दरसुची ९२-९३ नुसार तुलना केली असता दिलेले दर हे नविन दरसुची नुसार २.०१% जास्तीचे येत आहे.त्यामुळे १८.८६% जास्त दराची निविदा स्विकारणे योग्य.आदेशास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गुलशन महल ते चंपा मस्जीद या १००'डी.पी.रस्त्याचे डांबरीकरणाचे कामासाठी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १८.८६% जास्त दराच्या श्री.खाजा अमिनुद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६४/४ :**

मा.अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, बिबिका मकबरा ते हनुमान टेकडी या ८०'डी.पी.रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रु.१६,६७,६५६/- चे बनविण्यात आले असुन यास प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. सदरील कामाचा समावेश सन ९०-९१ च्या प्रशासकीय अनुदानातुन करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा नोटीस क्र.२० दि.१२-३-९३ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विकल्या गेल्या व त्यापैकी एक निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्या दि.२६-३-९३ रोजी उघडण्यात आल्या.त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) मे.रे.कन्स्ट्रक्शन १८.८०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त.

सदरील दर लक्षात घेवून नविन दरसुची ९२-९३ नुसार तुलना केली असता दिलेले दर हे नविन डि.एस.आर.नुसार २.६५% जास्तीचे येत आहेत.त्यामुळे १८.८०% जास्त दराची निविदा स्विकारणे योग्य.आदेशास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बिबिका मकबरा ते हनुमान टेकडी या ८०'डी.पी.रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १८.८०% जास्त दराच्या मे.रे.कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६५/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव केला आहे की, पा.पु.विभाग-२ सिडको देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी १०० मी.मी.व्यासाचे १५० मी.मी.व्यासाचे ए.सी.प्रेशर पाईप्स व सी.आय.डी.जॉईन्टस खरेदी करण्याच्या कामासाठी रुपये ४,९७,५७४/- अंदाजपत्रक तयार केलेले असुन त्याकरीता जा.क्र./मनपा/पा.पु-२/४३३/९३ दि.२६-३-९३ अन्वये दैनिक लोकविजय व दैनिक मुफस्सीर मध्ये निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या.त्याप्रमाणे अखेरच्या दिनांकापर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या असुन त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) जैन ॲसेबेस्टॉस प्रॉडक्टस ६.१८% जास्त दराने.
२) सागर इंटरप्रायजेस ०.०१% कमी दराने.

वरीलप्रमाणे निविदा मध्ये तुलनात्मक दृष्टया कमी दराची निविदा सागर इंटरप्रायजेस यांची अंदाजपत्रकीय ०.०१% कमी दराची आहे.तरी सागर इंटरप्रायजेस यांची निविदा मंजुर करण्याच्या व अंदाजपत्रकास मान्यता देण्याच्या विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको येथील पाणी पुरवठयाचे दुरुस्त व देखभालचे कामासाठी लागणारे १०० व १५० मी.मी.व्यासाचे ए.सी.पाईप व सिआयडी जॉईन्टस खरेदीच्या कामासाठी रक्कम रु.४,९७,५७४/- च्या अंदाजपत्रकास आणि उक्त साहित्य खरेदी करण्याकरीता तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या मे.सागर इंटरप्रायजेस यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६६/६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९२-९३ वर्षाकरीता पाणी पुरवठा विभागासाठी जी फी जॉईन्टस खरेदी करणेच्या रक्कम रु.४,९६,६००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीच्या दि.१७-१०-९२ च्या बैठकीत ठराव क्र.२६३/३ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.त्यानुसार कार्यालयीन निविदा क्र.मनपा/पा.पु./भांडार/४५३/९३ दि.११-३-९३ (दुसरी वेळ) अन्वये जाहिर निविदा मागविण्यात आल्या.सदरील निविदा दै.नवा मराठा व दै.औरंगाबाद टाईम्स मध्ये प्रसिध्द करण्यात आल्या.निविदा विक्रीच्या दिनांकास म्हणजे २०-३-९३ रोजी दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) ओरीएन्ट रबर प्रोडक्टस नागपुर ६.२१% जास्त
२) आर.के.घोष १४.१७% जास्त.

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.२१% जास्त दराची ओरिएन्ट रबर प्रोडक्टस नागपुर यांची निविदा आहे.

कार्यालयीन पत्रक क्र.मनपा/पा.पु.६१५/१/९३/ दि.३०-३-९३ अन्वये ओरिएन्ट रबर प्रोडक्टस नागपुर यांना पत्रक देवून वाटाघाटीसाठी मा.आयुक्त यांचे दालनात बोलाविले असता दि.३१-३-९३ रोजी वाटाघाटी होवून पुरवठा धारक ओरिएन्ट रबर प्रोडक्टस यांनी उपरोक्त दर कमी करुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.२१% जास्त दराने मालाचा पुरवठा करण्याचे मान्य केले.

तरी ४.२१% जास्त दराचे ओरिएन्ट रबर प्रोडक्टस नागपुर यांचे निविदा दरास मंजुरी मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन ९२-९३ वर्षाकरीता पाणी पुरवठा विभागासाठी आवश्यक असलेले जीफी जॉईन्टस खरेदी बाबत मे.ओरिएन्ट रबर प्रोडक्टस नागपुर यांचेशी दि.३१-३-९३ रोजी झालेल्या वाटाघाटी नुसार अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.२१% जासत दराने मे.ओरिएन्ट रबर प्रोडक्टस नागपुर यांचेकडून जीफी जॉईन्टस खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र.५६७/७ :**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विमुक्त व भटक्या जमातीसाठी वसंतराव नाईक महामंडळ मर्यादीत औरंगाबाद या संस्थेतर्फे उद्योग धंद्यासाठी विज भांडवल वाटप करण्यात येते.जिल्हा व्यवस्थापक वसंतराव महामंडळ मर्यादीत औरंगाबाद यांनी दि.३-४-९३ चे पत्र क्र.०६/९३नुसार मा.सभापती स्थायी समिती मनपा, औरंगाबाद यांना विनंती केली आहे की, सन ९१-९२ या आर्थिक वर्षात महानगरपालिका हद्दीतील विमुक्त जाती भटक्या जमातीच्या ६८ लाभार्थींना विविध उद्योग धंदा करण्यासाठी आमच्या कार्यालयातर्फे रुपये २,२५,३९०/- एवढे बिज भांडवल वाटप करण्यात आलेले आहे.तपशिलवार यादी व जातीचे प्रमाणपत्र सुचित केल्यानुसार आपणाकडे सादर केलेले आहे. कृपया महनगरपालिकेच्या सभेमध्ये सदर विषयावर चर्चा होवून मंजुर देवून अनुदान स्वरुपात निधी उपलब्ध झाल्यास हा समाज कर्ज मुक्त होईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका हद्दीतील विमुक्त भटक्या जमातींच्या लाभार्थींना विविध उद्योग धंदयाकरीता औरंगाबाद,महानगरपालिके तर्फे रक्कम रु.१,००,०००/-चे अनुदान देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६८/८ :**

उप आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की,महानगरपालिका औरंगाबाद तर्फे चालविण्यात येणारे प्राणी संग्रहालय व श्वानदंश प्रतिबंधक योजनेकरीता सन ९३-९४ या एका वित्तीय वर्षाकरीता खालील प्रकारच्या वस्तुंच्या/खाद्याच्या निविदा मागविण्यात आल्या.प्राप्त झालेल्या दरनिर्दिष्ट निविदाधारकांचे नांव त्यांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहे.

**अ) मटन निविदा**

१) श्री.हनिफ मो.अय्याज हड्डीसहित दर रु. ४३.००
विना हड्डी दर रु. ४५.००
२) श्री.खाजामियाँ अ.हमीद हड्डीसहित दर रु. ३३.७५
विना हड्डी दर रु. ३४.७५

तुलनात्मक दृष्टया श्री.खाजामिया अ.हमीद यांचे दर कमी आहेत.परंतु बाजारात सध्या मटनाचे दर रुपये ४८.०० पुढे आहेत.त्यामुळे श्री.खाजामिया अ.हमीद यांनी दिलेले दर बाजार भावापेक्षा अत्यंत कमी असलेने मालाच्या दर्जावर परिणाम होईल.म्हणून बाजार भावाचे दराजवळ असणारे श्री.हनिफ मो.अय्याज यांची निविदा मान्य करणे उचित ठरेल.

**ब) मासोळी निविदा**

१) श्री.मुमताज अहेमद दर प्रतिकिलो कतला रु.३८.५०
राहू रु. ३८.५०
मिरगळ रु. ३८.५०

वरीलप्रमाणे फक्त एकच निविदा प्राप्त झाली असुन सदरील दर बाजार भावापेक्षा कमी असलेले निविदा मान्य करणे योग्य.

**क) ब्रेड निविदा**

१) मे.सवेरा बेकरी प्रतिपुडा २५० ग्रॅम रुपये ४.००
२) मे.एलोरा बेकरी --//-- --//-- रुपये ३.५०
३) मे.लकी बेकरी --//-- --//-- रुपये ३.७५

वरीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या.पैकी मे.एलोरा बेकरी यांचे दर सर्वात कमी आहेत.

**ड) ल्युसर्न घास निवदा**

१) श्री.रामचंद्र मंडावत दर प्रतिकिलो रुपये २.९०
२) श्री.जनार्धन शेळके --//-- रुपये २.७०
३) श्री.शांतीलाल रामलाल --//-- रुपये २.९५

वरीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या पैकी श्री.जनार्धन शेळके यांची निविदा सर्वात कमी दराची आहे.

**ई) कडबा (बाटक) निविदा**

१) श्री.अ. रऊफ दादामिया दर प्रतिटन रुपये ३,९७५/-
२) श्री.अ.मजीद शे.चाँद --//-- रुपये ४,००१/-
३) श्री.शे.कय्युम शे.महेमुद --//-- रुपये ४,०००/-

वरीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या.पैकी श्री.अ. रऊफ दादामिया चौधरी यांच्या निविदेचे दर सर्वात कमी आहेत.

**ई) इतर पदार्थ निविदा**

| अ.क्र. | मालाचे नांव | मे.केदारनाथ दरक | मे.लाहोटी प्रोव्हीजन्स | मे.लक्ष्मी ट्रेडींग कंपनी |
|---|---|---|---|---|
| १ | हरभरे प्रति किलो | १७.०० | १५.०० | १६.०० |
| २ | मका प्रति किलो | ७.०० | ५.०० | ६.०० |
| ३ | गहू प्रति किलो | ७.०० | ६.०० | ६.५० |
| ४ | तांदुळ प्रति किलो | १०.५० | ९.५० | १०.०० |
| ५ | फुटाणे प्रति किलो | २२.०० | २०.०० | २१.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | शेंगदाणे प्रति किलो | २४.०० | २२.०० | २३.०० |
| ७ | गुळ प्रति किलो | १३.०० | १३.०० | १४.०० |
| ८ | निरमा साबण प्रति नग | ३.०० | २.५० | ७.०० |
| ९ | लाईफबॉय साबण प्रति नग | ७.५० | ६.५० | ७.०० |
| १० | रिन सोप प्र.नग | ८.५० | ७.५० | ८.०० |
| ११ | शेंगदाणे पेंड प्र.कि. | ७.०० | ६.०० | ६.५० |
| १२ | निरमा पावडर प्रति किलो | १७.०० | १६.०० | १६.५० |
| १३ | माचीस बॉक्स | ३.०० | २.५० | ३.०० |
| १४ | लक्स सोप प्रति नग | ८.०० | ७.०० | ७.५० |

वरीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या.पैकी ॲटम क्र.१ ते ६ व ८ ते १४ चे दर मे.लाहोटी प्रोव्हीजन्सचे सर्वात कमी आहेत.तर ॲटम क्र.७ चे मे.केदारनाथ दरक यांचे व मे.लाहोटी प्रोव्हीजन्स यांचे दर समान आहेत.करीता इतर सर्व ॲटमचे दर मे.लाहोटी प्रोव्हीजन्सचे कमी असलेले ॲटम क्र.७ सुध्दा मे.लाहोटी प्रोव्हीजन्स यांचे दर मंजूर करणे योग्य.म्हणजे मे.लाहोटी प्रोव्हीजन्स यांची निविदा मंजुर करणे योग्य.

**<u>फ) फळफळावळ व भाजीपाला निविदा</u>**

| अ.क्र. | मालाचे नांव | श्री.रामचंद्र मंडावत | श्री.अ.रऊफ दादामिया | श्री.जनार्धन शेळके |
|---|---|---|---|---|
| १ | केळी प्रति डझन | ७.५० | ६.०० | ८.०० |
| २ | मोसंबी प्रति डझन | २४.५० | २४.०० | २५.०० |
| ३ | चिकु प्रति डझन | १२.०० | १०.०० | १०.५० |
| ४ | पिकलेले टामॅटो प्र.किलो | ९.०० | ८.०० | १०.०० |
| ५ | बटाटे प्रति किलो | ७.०० | ६.०० | ६.५० |
| ६ | काकडी प्रति किलो | ८.५० | ७.०० | १०.०० |
| ७ | गाजर प्रति किलो | ४.०० | ३.५० | ५.०० |

वरीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या.पैकी श्री.अ.रऊफ दादामिया चौधरी यांचे दर सर्वात कमी आहेत.

**ट) <u>अमृत पशुखादय निविदा</u>**

१) मे.शांती एजन्सी दर प्रति क्विंटल रुपये ४४०/-
२) मे.अरिहंत ट्रेडींग कं. --//-- रुपये ४२६=७५/-

वरीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या पैकी मे.अरिहंत ट्रेडींग कंपनी यांचे दर कमी आहेत.

या शिवाय प्राणी संग्रहालयास दररोज खालीलप्रमाणे पदार्थ लागतात.

१) दुध शासकीय दराप्रमाणे खरेदी करण्यात येते.
२) रॉकेल शासकीय दराप्रमाणे आवश्यकता वाटेल त्याप्रमाणे खरेदी करण्यात येते.
३) स्वयंपाकाचा गॅस अधिकृत विक्रेत्याकडून ठरविण्यात आलेल्या दराप्रमाणे खरेदी करण्यात येते.

काही अपरिहार्य कारणास्तव परील पदार्थ उपलब्ध न झाल्यास खुल्या बाजारातून अग्रीम रक्कमेतुन खरेदी करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.अजिजुल्ला बेग :** प्राणी संग्रहालयासाठी खरेदी करावयाच्या प्रस्तावित साहित्यापैकी मटनाची एकूण मागणी किती त्यावर खर्च किती होतो आणि त्यासाठी तरतुद किती रुपयाची आहे.याचा खुलासा व्हावा.

**पशुधन विकास अधिकारी :** पशुधन विकास विभागासाठी लागणारे साहित्य प्राणी व इतर खर्चासाठी मिळून वार्षिक रुपये १४ लाखाची तरतुद करण्यात आली आहे.प्राणी संग्रहालयात असलेल्या प्राण्याकरीता दर दिवशी चार किलो मटनाची आवश्यकता असते.

**श्री.अजिजुल्ला बेग :** प्रस्तावित साहित्य खरेदी पैकी श्री.खाजामिया अ.हमीद यांचे मटनाचे दर कमी असतांनाही प्रशासनाने श्री.हनफी मो.अय्याज यांचे दराची शिफारस केली आहे.परंतु दोन्ही दरपत्रक धारकांचे मध्ये बराच फरक असल्यामुळे कमी दराचे श्री.खाजामियाँ अ.हमीद यांचे दरपत्रक मंजुर करण्यात यावे.

**पशुधन विकास अधिकारी :** सध्या चालू असलेल्या बाजार भावाप्रमाणे श्री.हनफी मो.अच्याज यांचे दरपत्रकाचे दर बरोबर आहेत.श्री.खाजामियाँ अ.हमीद यांचे दर मंजुर केल्यास मालाचा दर्जा व्यवस्थीत येणार नाही.

**मा.सभापती :** प्राणी संग्रहालयासाठी आवश्यक असलेले मटन खरेदी करीता श्री.खाजामियाँ अ.हमीद यांचे दरपत्रकाचे दर कमी असल्याने ते मंजुर करण्यात येतात.गुत्तेदाराने मालाचा दर्जा व्यवस्थीत दिला नाही तर पशुधन विकास अधिकारी यांनी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ओरंगाबाद महानगरपालिकेतर्फे चालविण्यात येणाऱ्या प्राणी संग्रहालय व श्वानदंश प्रतिबंधक योजनेकरीता सन १९९३-९४ या वित्तीय वर्षाकरीता खालील प्रकारच्या वस्तु/खाद्य निविदांना मंजुरी देण्यात येते.

अ) मटन खरेदी करीता श्री.खाजामियाँ अ.हमीद यांचे हड्डीसहित रुपये ३३.७५ आणि विनाहड्डी रुपये ३४.७५ या कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

ब) कतला,रुह,मिरगळ या प्रकारच्या मासोळी करीता प्रत्येकी प्रति किलो रुपये ३८.५० या दराचे श्री.मुमताज अहेमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

क) २५० ग्रॅम प्रति पुडा ब्रेड करीता रुपये ३.५० या दराचे मे.एलोरा बेकरी यांचे कमी दराचे दर पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

ड) ल्युसर्न घास करीता प्रति किलो रुपये २.७० या दराचे श्री.जनार्धन शेळके यांचे सर्वात कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

इ) कडबा(बाटुक) याकरीता प्रतिटन रुपये ३,९७५/- या सर्वात कमी दराचे श्री.अ.रऊफ दादामियाँ चौधरी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

ई) इतर पदार्थ (हरभरा,मका,गहू इत्यादी) खरेदी करीता प्रस्तावात दर्शविलेल्या ॲटम करीता मे.लाहोटी प्रोव्हीजन्स यांचे सर्वात कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

फ) फळफळावळ व भाजीपाला (केळी,मोसंबी,चिकू इत्यादी) करीता प्रस्तावात दर्शविलेल्या अ.क्र.१ ते ७ करीता श्री.अ.रऊफ दादामिया चौधरी यांचे सर्वात कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

ट) अमृत पशुखादय खरेदी करीता प्रति क्विंटल रुपये ४२६.७५ या दराचे मे. अरिहंत ट्रेडींग कं.यांचे सर्वात कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

याशिवाय दुध,रॉकेल,स्वयंपाकाचा गॅस याकरीता अनुक्रमे शासकीय दरापमाणे आणि अधिकृत विक्रेत्याकडून साहित्य खरेदी करीता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.तसेच काही अपरिहार्य कारणास्तव वरील पदार्थ उपलब्ध न झाल्यास अग्रीम रक्कमेतून खुल्या बाजारातुन खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

कामाची तातडी लक्षात घेता सदर प्रस्तावास या सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६९/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग,१५०वॅट सोडीयम व्हेपर बल्ब बँक्रेट व कलॅम्स हे साहित्य खरेदी करण्याकरीता सन १९९२-९३ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.१६,५१,५५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.सदरचा खर्च १९९२-९३ च्या शासकीय अनुदानातून करण्यात येईल.

सदर साहित्य खरेदी करण्याकरीता दै.लोकमत,दै.इंडियन एक्सप्रेस,दै.महाराष्ट्र टाईम्स या राज्यपातळी वरील वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करून फॉर्म डी.मध्ये दर मागविले असता एकूण सहा कोरी "डी" फॉर्म निविदा पत्रके विकल्या गेली व सहाही निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.दि.११-३-९३ ऐवजी सदर निविदा पत्रके मुख्य लेखा परिक्षक अतिरिक्त शहर अभियंता व उपस्थित पुरवठा दरांच्या समक्ष उघडण्यात आली.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पुरवठा धारकाचे/एजन्सीचे नांव | १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग्ज | ॲटम क्रमांक | | क्लॅम्प्स |
|---|---|---|---|---|---|
| | | | १५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब | ब्रॅकेट | |
| १ | मे.मेघदुत इले.अँड इलेक्ट्रॉनिक्स,मुंबई | अ) १९३६-००<br>ब) २२६१.०० | ५४७-००<br>बजाज मेक | २६७-०० | ४८-०० |
| २ | मे.प्रविण इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद | २१९९-०० | ५५९-०० | १९९-०० | ६४-०० |
| ३ | मे.पगारीया इंटरप्रायजेस,औरंगाबाद. | १९२१-००<br>(क्रॉम्प्टन मेक) | ५७१-००<br>(क्रॉम्प्टन मेक) | १९३-०० | ३१-०० |
| ४ | मे.ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट,मुंबई. | १८७१-९७<br>(बजाज मेक)<br>२०७७-१५<br>(सिमामेक)<br>१९३६-३०<br>(क्रॉम्प्टन मेक) | ५८१-००<br>(बजाज मेक)<br>४९०-००<br>(सिमामेक)<br>५८५-००<br>(क्रॉम्प्टन मेक) | ३२६-७० | ४६-०० |
| ५ | मे.सत्य इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद. | २५७१-००<br>(फिलिप्स मेक) | ४६४-००<br>(फिलिप्स मेक) | १५५-०० | ४९-०० |
| ६ | मे.एन.एस.जैन,पुणे. | १९५१-००<br>(क्रॉम्प्टन मेक) | ५५०-००<br>(क्रॉम्प्टन मेक) | २४०-०० | ८०-०० |

वरील निविदा पत्रकापैकी ॲटम क्र.१ करीता मे.ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई. ॲटम क्र.२ व ३ करीता मे.सत्य इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद व

ॲटम क्र.करीता मे.पगारीया इंटरप्रायजेस,औरंगाबाद.यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी आहेत.

मे.ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांनी नियमाप्रमाणे निविदा पत्रकासोबत १% इसाऱ्याची रक्कम जमा केलेली नाही.तसेच नमुद केलेले दर जकात वगळता दिले आहेत.तसेच त्यांना बिल बँकेमार्फत देणे असल्याने बँक चार्जेस ही महानगरपालिकेस द्यावे लागतील.

परंतु सदर साहित्य एकमेकांशी संलग्न असल्याने एकाच एजन्सीकडून पुरवठा दराकडून खरेदी करणे योग्य होईल.करीता सदर साहित्य एकाच एजन्सीकडून / पुरवठा दाराकडून खरेदी करावयाचे असल्यास तुलनात्मक दृष्टया मे.सत्य इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी येतात.त्यांचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

| ॲटम क्र. | साहित्याचे नांव | नग | दर (प्रति नग) | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | १५० वॅट सोडियम व्हेपर फिटींग | ४२५ | १९२१-०० | ८,१६,४२५=०० |
| २ | १५० वॅट सोडियम व्हेपर बल्ब | ४२५ | ४६४-०० | १,९७,२००/- |
| ३ | ब्रॅकेट | ४२५ | १५५-०० | ६५,८७५/- |
| ४ | क्लॅम्प्स | ८५० | ८४०-०० | ४१,६५०/- |
| | | | एकूण | ११,२१,१५०=०० |

वरील तक्त्या नुसार मे.सत्य इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद.यांच्या दराप्रमाणे वरील साहित्याची एकूण किंमत रक्कम रु.११,२१,१५०/- इतकी येते.तरी उपरोक्त साहित्य मे.सत्य इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद.यांच्या कडून वर दर्शविलेल्या दरामध्ये खरेदी करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**अतिरिक्त शहर अभियंता :** १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग व १५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब ब्रॅक्रेट व क्लॅम्क्स हे साहित्य खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या दरपत्रकानुसार सर्वात कमी दराच दरपत्रका नुसार एकूण रक्कम रु.११,२१,१५०/-चे साहित्य खरेदी होईल.सदरील प्रस्तावाचे अंदाजपत्रक रुपये १६,१५,४८२/- चे आहे.ज्यात फिटींग ४२५ आहेत.शहराचा वाढता व्याप लक्षात घेता ४२५ फिटींग ऐवजी ६०० नग फिटींग वाढविल्यास टेंडर दराने एकूण १५,८२,८००/- खर्च होतात.तेव्हा फिटींगची प्रस्तावातील मुळ संख्या वाढविण्यास मंजुरी देण्यात यावी.

**मा.सभापती :** अतिरिक्त शहर अभियंता यांचे सुचनेप्रमाणे ४२५ सोडीयम व्हेपर फिटींग ऐवजी ६०० नग फिटींग खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग,१५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब,ब्रॅकेट व क्लॅम्प्स हे साहित्या खरेदी करण्या करीता फॉर्म "डी" मध्ये मागविलेल्या निविदा पैकी ॲटम क्र.१ ते ४ करीता वेगवेगळया दरपत्रक धारकांचे त्या त्या ॲटम करीता दर कमी असले तरी साहित्य एकमेकांशी संलग्न असल्याने एकाच एजन्सी कडून खरेदी योग्य होणार असल्यामुळे प्राप्त सहा दरपत्रक धारकांपैकी मे.सत्य इलेक्ट्रीकल्स,औरंगाबाद यांचेकडून खालील दर्शविलेल्या दराने ॲटम क्र.१ ते ४ साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| ॲटम | साहित्याचे नांव | नग | (प्रती नग) | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|

| क्रमांक | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग | ६०० | १९२१-०० | ११,५२,६००=०० |
| २ | १५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब | ६०० | ४६४-०० | २,७८,४००=०० |
| ३ | ब्रॅकेट | ६००/- | १५५-०० | ९३,०००=०० |
| ४ | क्लॅम्प्स | १२०० | ४९-०० | ५८,०००=०० |
| | | | एकूण | १५,८२,८००=०० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले."

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती
महानगरपालिका,औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २१-४-१९९३ रोजी दुपारी ३=३० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. सोमवार दिनांक २१-४-९३ रोजी दुपारी ३=४५ वाजता समिती सभागृहात मा.सभापती ॲड.श्री.इगबालसिंग गिल यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१) मा.श्री.नारायण मोहन फत्तेलष्कर
२) मा.श्री. अलिम बेग मिर्झा कलिम बेग
३) मा.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
४) मा.श्री. विजय गोविंदलाल पालीवाल
५) मा.श्री. अजिजुल्ला बेग बाहेद बेग
६) मा.श्री.पेरकर विठ्ठल कोंडाजी.

**विषय क्र.५७०/१ :**

दिनांक ३-४-१९९३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.मधुकर शिंदे :** अर्थसंकल्पाच्या मंजुरीनुसार नगरसेवकांच्या एक लाख स्वेच्छा निधितील रक्कम ३ महिन्यासाठी रुपये २५,०००/- या प्रमाणे खर्च करता येईल असा खुलासा प्रशासनातर्फे झाला आहे.तेव्हा नगरसेवकांचा स्वेच्छा निधी कशा प्रकारे खर्च करावा हे नगरसेवकांच्या इच्छेवर असतांना अशा प्रकारे अट का घालण्यात आली याचा खुलासा व्हावा.

**मा.प्रभारी उप आयुक्त :** प्रशासकीय करणास्तव अशा प्रकारची व्यवस्था करण्यात आली आहे.स.सभासदांची वाढीव संख्या लक्षात घेता चालु अर्थसंकल्पात ७८ लाख रुपयाची तरतुद केली आहे. त्यामुळे स.सभासदांच्या स्वेच्छा निधीत वाढ करण्याचा प्रश्नच येत नाही.

**श्री.गिरजाराम हाळनोर,श्री.विठ्ठल पेरकर,श्री.अजिजुल्लाबेग :** नगरसेवकांना त्यांचे इच्छेनुसार स्वेच्छा निधी खर्च करण्याचे अधिकार आहेत. तेव्हा स.सभासदांनी सुचविल्याप्रमाणे नगरसेवकांच्या स्वेच्छा निधिच्या खर्चाबाबत प्रशासनाने निर्बंध घालू नयेत.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** महापालिकेस शासनाकडून ५.१० कोटी रुपयाचे अनुदान प्राप्त झाले आहे.याशिवाय विविध कराद्वारे रोजची वसुलिही होत आहे अशी परिस्थिती असतांनाही ठेकेदारांची बिले रोखुन ठेवण्यात येतात अशी माहिती मिळाली आहे.तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**मा.प्रभारी उप आयुक्त :** शासनाकडून मिळालेले ५.१० कोटी रुपयाचे अनुदान विशिष्ट कामासाठी देण्यात आले आहे.या व्यतिरिक्त जी कामे करण्यात येतात त्या कामांची देयके प्रशासनास रोज प्राप्त होणारे उत्पन्न आणि खर्च यातून जास्तीत जास्त बचत करण्याचा प्रयत्न केला आहे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** शासनाकडून मिळालेल्या अनुदानापैकी पन्नास लाख रुपयाची रक्कम अल्पबचत खात्यात गुंतविण्यात आल्याचे कळाले आहे.त्याबाबत खुलासा व्हावा.

**मा.प्रभारी उप आयुक्त :** औरंगाबाद जिल्हयासाठी शासनाने अल्पबचतीचे दिलेले उद्दीष्ट पुर्ण करणे आवश्यक असल्यामुळे मा.जिल्हाधिकारी यांच्या विनंती नुसार अल्पबचत मध्ये रक्कम गुंतविण्यात आली आहे.

**श्री.अजिजुल्ला बेग :** आर्थिक बाबीचे धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेस आहे.

**मा.सभापती :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे अल्पबचत योजनेत गुंतविलेली शासकीय अनुदानाची रक्कम चार दिवसाच्या आत मनपा फंडात जमा करावी अन्यथा या बाबत शासनास कळविण्यात येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर,श्री.मधुकर शिंदे,श्री.नारायण फत्तेलष्कर :** ३ वर्ष एकाच ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नियमाप्रमाणे बदल्या करण्यात याव्यात अशी मागणी सभागृहात करण्यात आली असता १५ एप्रिल १९९३ रोजी ३ वर्ष एकाच ठिकाणी काम केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येतील असे प्रशासनातर्फे सभागृहाला आश्वासन देण्यात आलेले होते. परंतु आज पर्यंत याबाबत कार्यवाही झालेली दिसत नाही. मिळालेल्या माहितीनुसार बदली प्रकरणात लाखो रुपये जमा करण्यात आले आहे. तेव्हा कर्मचाऱ्यांच्या बदल्या का झाल्या नाहीत याबाबत खुलासा व्हावा. तोपर्यंत आजच्या मिटींगचे कामकाज पुढे चालु करु देणार नाही.

**मा.प्रभारी उप आयुक्त :** स.नगरसेवकांनी प्रशासनाला वेडेवाकडे व अपमानकारक शब्द वापरु नये.मा.उप आयुक्त प्रशासना निमित्त दिल्लीला गेलेले आहे ते दिल्लीहून परतल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर,श्री.मधुकर शिंदे,श्री.नारायण फत्तेलष्कर :** कर्मचाऱ्यांच्या बदली प्रकरणी प्रशासनातर्फे काय कार्यवाही करण्यात आली याचा खुलासा सहाय्यक आयुक्त-१ यांनी करावा.

**सहाय्यक आयुक्त-१ :** ३ वर्षापेक्षा जास्त काळ एकाच विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी तयार करुन संबंधित संचिका मा.उप आयुक्त यांचेकडे पाठविण्यात आली आहे.

**मा.प्रभारी उप आयुक्त :** बदली बाबतची संचिका मा.उप आयुक्त यांच्याकडे आहे ते प्रशिक्षणा वरुन परतल्यानंतर त्याबाबतचा आदेश काढला जाईल.

**मा.सभापती :** कर्मचाऱ्यांच्या बदली बाबतचे आदेश काढण्या बाबत प्रशासनाने सभागृहाकडून १५ एप्रिल ही मुदत घेतली होती. या मुदतीनुसार अंमलबजावणी झाली नाही.हा सभागृहाचा अवमान आहे. तेव्हा मा.उप आयुक्त यांच्या कपाटातून सदर संचिका काढून घेवून बदली आदेशा बाबत आताच सही करण्यात यावी व त्याची अंमलबजावणी करावी. शेवटची संधी म्हणून सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कर्मचाऱ्यांच्या बदली प्रकरणी प्रशासनाने २७ एप्रिल रोजी बदलीचे आदेश काढून या आदेशाची ३० एप्रिल रोजी अंमलबजावणी करावी.

**श्री.अजिजुल्ला बेग,श्री.गिरजाराम हाळनोर :** ३१ मार्चची आर्थिक स्थिती दर्शविणारा ताळमेळ आणि प्रशासकीय कार्यवाही बाबतची माहिती एप्रिल महिन्यात होणाऱ्या पहिल्या मिटींगमध्ये देण्यात येईल असे आश्वासन मुख्यलेखा परिक्षक यांनी

मागील सभेत दिले होते. ३१ मार्च नंतर एप्रिल महिन्यात होणारी ही पहिलीच मिटींग आहे.तेव्हा मु.प्र.मनपा अधिनियम १९४९ चे कलमा अन्वये उक्त माहिती बाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा.प्रभारी उप-आयुक्त :** ३१ मार्च अखेरचे कामे पुर्ण होत आली आहेत. तेव्हा स.सदस्यांच्या सुचनेप्रमाणे आवश्यक ती माहिती पुढील सभेत देण्याची व्यवस्था केली जाईल.

**श्री.गिरजाराम हाळानोर :** एकनाथनगर येथील म्हाडाची जागा ताब्यात घेवून त्यावर शालेय इमारत बांधण्यात यावी असा निर्णय सभागृहाने घेतलेला आहे. तेव्हा या प्रकरणी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**शहर अभियंता :** सभागृहाच्या निर्णया प्रमाणे सन १९९३-९४ या वर्षात एकनाथनगर येथे शाळेचे बांधकाम करण्यात येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर :** ज्योतीनगर येथील ओपन स्पेसच्या न्यायप्रविष्ट प्रकरणात नगर रचना विभागाचे सहा.संचालक, विधी सल्लागार आणि श्री.पठाण यांनी आवश्यक ती कार्यवाही केल्यामुळे सदर प्रकरणी मनपाच्या बाजुने निकाल लागल्या बद्दल उक्त अधिकारी व कर्मचारी यांचे शाब्दीक अभिनंदन करण्यात येते.

**ठराव :**

दिनांक ३-४-९३ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५७१/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहाय मध्ये माकडाचे,कोल्हयाचे आराम करण्याचे व फिरण्याचे शेड बांधकाम करणे बाबत अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ४०७/२ दि.२३-१२-९३ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.त्या अनुषंगाने सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या करीता दै.लोक विजय,दै.मुफस्सीर,दै.रहेबर इ.वर्तमानपत्रात सुचना प्रसिध्द करण्यात आली.एकूण सहा निविदा विक्री झाल्या.पैकी मे.एस.एच.असोशिएटस यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.८६% जास्त दराची एकमेव निविदा प्राप्त झाली.

गुत्तेदराने दिलेले दर हे सन १९९१-९२ च्या दरापेक्षा ९.८६% जास्त व ९२-९३ च्या दरसुचीपेक्षा ८.२३% कमी येतात.म्हणून श्री.एस.एच.असोशिएटस यांचे ९.८६% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालयामध्ये माकडाचे,कोल्हयाचे आराम करण्याचे व फिरण्याचे शेड बांधण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.८६% जास्त दराच्या मे. एस.एच.असोशिएटस यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**:-ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र.५७२/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रमानगर बौध्द स्मशानभुमी येथे कंपाऊंड वॉल बांधणेच्या कामाचे रक्कम रु. ४,१६,०००८/- च्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांच्या मंजुरी अन्वये सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्या करीता

दै.लोकविजय,दै.मुफस्सीर,दै.रहेबर इ. वर्तमानपत्रात सुचना प्रसिध्द करण्यात आली असता एकूण दोन निविदा विक्री झाल्या व दोनही निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे.

१) श्री.कैसरखान ९.९९% जास्त
२) कार्तीकी कन्स्ट्रक्शन १५% जास्त

सदर कामाच्या दराबाबत मा.आयुक्तांच्या आदेशान्वये संबंधीत एजन्सीस वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यात गुत्तेदराची ८% जास्त काम करण्यास संमती दर्शविली आहे.सदर शासकीय अनुदान ९२-९३ या तरतुदीतुन करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रमानगर बौध्द स्मशानभुमीस कंपाऊंड वॉल बांधण्याच्या कामाकरीता गुत्तेदार श्री.कैसरखान यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधीत गुत्तेदराकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५७३/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, लहान कामाकरीता नियोजित उद्यानामध्ये खेळणी बसविणे बाबत शासकीय अनुदानातुन रक्कम रु. ४,४५,४६०/- चे अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मान्यता मिळाल्यानंतर जाहीर प्रगटनाद्वारे दै.औरंगाबाद व नवा मराठा मध्ये फॉर्म "डी" मध्ये प्रसिध्दी दिली असता एकूण तीन निविदा विकल्या गेल्या होत्या व तीन निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | औरंगाबाद फेब्रीकेशन वर्क्स | अंदाजपत्रकीय दराने |
| २) | अग्रवाल इक्वीपमेंट | १.२५% कमी |
| ३) | वर्षा मेटल वर्क्स | २% कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची मे.वर्षा मेटल वर्क्स यांची निविदा आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लहान मुलांकरीता नियोजित उद्यानामध्ये खेळणी बसविणेच्या कामाकरीता तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराच्या मे.वर्षा मेटल वर्क्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५७४/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, किराडपुरा स्लम भागातील जुन्या रस्त्याची दुरुस्ती करणेचा ठराव क्र.३६/५ दि. ८-६-९२ द्वारे अंदाजपत्रक रक्कम रु. ४,७४,७५०/- ला मंजुरी देण्यात आली.त्यानुसार सदरील कामासाठी दै.लोकविजय,मुफस्सीर रहेबर या दैनिकात सुचना प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विक्री झाल्या व तीनही दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.पी.जे.तमखाने | ७.७१% जास्त |
| २) | श्री.जी.एम.कटारीया | १६.५% जास्त |
| ३) | श्री.खाजा अमिनुद्दीन | ०.५% कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराची श्री.खाजा अमिनुद्दीन यांची निविदा आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपुरा स्लम भागातील जुन्या रस्त्याची दुरुस्ती करुन डांबरीकरण करणेचे कामाकरीता तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराच्या श्री.खाजा अमिनुद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५७५/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मांडकी रस्त्यावरील ट्रेनिंग ग्राऊंड अंतर्गत रस्त्याचे पुर्नखडीकरण करणेसाठी रक्कम रु. ३,८४,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.६८/३७ दि.८-६-९२ ला मंजुरी मिळाली त्यानुसार दै.लोकविजय,मुफस्सीर रहेबर मध्ये सुचना प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण १० कोऱ्या निविदा विक्री झाल्या.पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.त्या खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.कुलवंतसिंग | ५% जास्त |
| २) | श्री.सुखबिरसिंग | २५.५% जास्त |
| ३) | श्री.स.रफिकुद्दीन | ०.२% कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२% कमी दराची श्री.सय्यद रफिकुद्दीन यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मांडकी रस्त्यावरील ट्रेनिंग ग्राऊंड अंतर्गत रस्त्याचे पुर्नखडीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२% कमी दराच्या श्री.सैय्यद रफिकोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५७६/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,झाडांच्या संरक्षणा करीता शासकीय अनुदानातुन लोखंडी जाळया (ट्री गार्ड) पुरवठा करणे बाबत रक्कम रु.४,७०,४००/-चे मा.आयुक्त यांचे मंजुरीनुसार सदर कामाचे "डी" फॉर्म नमुन्यात निविदा मागविण्या करीता ऐ.अजिंठा व दै.आलमगिर टाईम्स वर्तमानपत्रात दुरुस्ती वेळेस प्रसिध्दी करण्यात आले.विक्रीच्या तारखेपर्यंत तीन कोऱ्या निविदा विकल्या गेल्या होत्या व तीनही प्राप्त झाल्या असुन प्रति नगाप्रमाणे दर दिले आहे.

| अ.क्र. | पुरवठा धारकाचे नांव | दिलेले दर |
|---|---|---|
| १ | वर्षा मेटल वर्क्स | ३४०/- प्र. |
| २ | एम.एस.आय.डी.सी. | ३४२/- प्र. |
| ३ | अशोक कामगार सह.संस्था | ४११-६० |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराचे वर्षा मेटल वर्क्स यांचे प्रति नग रु.३४०/- प्रमाणे मनपास एकूण १२०० नग लोखंडी जाळया पुरवठा करणेस मंजुरी देण्याबाबत प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झाडाच्या संरक्षणा करीता तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजेच प्रति नग रुपये ३४०/- या दराने मे.वर्षा मेटल वर्क्स यांचे कडून १२०० नग लोखंडी जाळया (ट्री गार्ड) तयार करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५७७/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मजनुहील येथील नियोजित उद्यानामध्ये विविध प्रकारचे कारंजे बसविणे बाबत कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.२०,०००,००=००लक्ष मा.आयुक्तांच्या मंजुरी अन्वये सदर कामाचे फेर निविदा शहरातील दै.लोकमत,दै.इंडियन एक्सप्रेस इत्यादी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले त्या अनुषंगाने सिलबंद पाकीटात दोन निविदा दर भरुन प्राप्त झाली.सदरील निविदा पत्रके उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यात आली त्यात दर्शविलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सी | दिलेली रक्कम काम पुर्ण करावयाची |
|---|---|---|
| १ | नेलट्रानीक पुणे | १६,२६,५००/- |
| २ | अक्यट्रानीक अहमद नगर | १८,००,०००/- |

सदरील निविदा पत्रात तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी नेलट्रानीक्स पुणे यांचे १६,२६,५००/-चे आहे.सदर खर्च शासकीय अनुदान या तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मजनुहील येथील नियोजित उद्यानामध्ये विविध प्रकारचे कारंजे बसविण्याचे कामा करीता रुपये १६,२६,५००/- या तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराचे मे.नेलट्रानीक पुणे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५७८/९ :**

मा.उप आयुक्त मनपा,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की,औरंगाबाद महापालिके अंतर्गत सांस्कृतीक कार्यक्रम अधिकारी (वर्ग-३) हे एक पद रुपये १४००-४०-१६००-५०-२३००-दशे-६०-२६०० या वेतन श्रेणीत कार्यरत आहे.

औरंगाबाद महानरपालिके अंतर्गत ७३ प्राथमिक शाळा व ४० बालवाडया कार्यरत आहेत.या सर्वांचे संनियंत्रण शिक्षणाधिकारी (वर्ग-२) यांच्या मार्फत होते.सांस्कृतीक कार्यक्रम अधिकारी यांच्या कामाचे स्वरुप अधिक व्यापक व विस्तारीत करण्यासाठी व शिक्षणाधिकारी यांना त्यांच्या दैनंदिन कामात मदत करण्यासाठी तसेच प्रशासकीय सोयीसाठी सांस्कृतिक कार्यक्रम अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी असे करणे गरजेचे आहे.

उपरोक्त प्रस्ताव हा नविन पद निर्मितीचा असुन केवळ शिक्षणाधिकारी यांना त्यांच्या दैनंदिन कार्यात मदत करण्यासाठी तसेच प्रशासकीय सोयीसाठी सांस्कृतिक कार्यक्रम अधिकारी यांचे पदनाम सास्कृतिक कार्यक्रम अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी असे करण्याबाबत विचारार्थ ठेवण्यात येत आहे.या बदलामुळे मनपाच्या आस्थापनेवर आर्थीक बोजा पडणार नाही.तथापि सांस्कृतिक कार्यक्रम अधिकारी यांच्या वाढीव वेतन श्रेणी बाबतचा प्रस्ताव शासनाकडे यापुर्वीच मंजुरीस्तव पाठविण्यात आलेला आहे. त्या शासन निर्णयास अधिन राहून हे पदनाम बदलण्यात यावे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत कार्यरत असलेल्या ७३ प्राथमिक शाळा व ४० बालवाडया यांचे दैनंदिन व प्रशासकीय कामात वर्ग-२ चे शिक्षण अधिकारी यांना मदत करण्यासाठी रुपये १४०० ते २६०० या वेतन श्रेणीत कार्यरत असलेल्या सांस्कृतीक अधिकारी यांच्या कामाचे स्वरुप अधिक व्यापक व विस्तारीत करण्यासाठी सांस्कृतीक कार्यक्रम अधिकारी या पदाचे नांव बदलून सांस्कृतीक कार्यक्रम अधिकारी तथा उप शिक्षण अधिकारी या प्रमाणे बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५७९/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ९३-९४ या साला करीता पहिल्या तिमाहीसाठी विविध विभागातील मागणीप्रमाणे ५२८१० गोणी इतकी आहे.त्याची अंदाजे किंमत ५३,३३,८१०/- (त्रेपन्न लाख तेहसीस हजार आठशे दहा) इतकी होते.त्या आधारे खुल्या बाजारातुन सिमेंट खरेदी करीता नविन निविदा मागविण्यास मा.सभापती स्थायी समिती यांना कळविले असता मा.सभापती स्थायी समिती यांनी दिनांक १७-४-९३ रोजी असा आदेश दिला की,सिमेंटची अत्यंत गरज आहे. तरी काढलेली निविदा पुढील तीन महिन्यासाठी काढण्यात यावी व आताच्या मागणी प्रमाणे ५२८१० गोण्यांपैकी ४०,००० (चाळीस हजार) गोणी सिमेंट पुर्वीचे पुरवठा धारक मे.व्ही.ए.ट्रेनिंग कंपनी यांच्या कडून पुर्वीच्या दराप्रमाणे व पुर्वीच्या अटीप्रमाणे रु.१०१/- (एकशे एक) रुपये प्रति गोणी व प्रति मे.टन २०२०/-(दोन हजार वीस) या दराने २००० मे.टन सिमेंट खरेदीची मंजुरी दिली जाते.

तरी २००० मे.टन सिमेंट व्ही.ए.ट्रेनिंग कंपनी यांना अदा करण्यास्तव व मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९३-९४ यावर्षाचे पहिल्या तिमाहीसाठी आवश्यक असलेल्या सिमेंट पैकी ४०,०००/- गोणी सिमेंट पुर्वीचे पुरवठा धारक मे.व्ही.ए.ट्रेनिंग कंपनी यांचे कडून पुर्वीच्याच मंजुरा दराने म्हणजे प्रति टन २०२०/- या दराने २००० मेट्रीक टन सिमेंट खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५८०/११ :**

मा.आयुक्त यांचे कडून प्रस्ताव सादर करण्यात येत आहे, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळातर्फे केल्या जाणाऱ्या ठोक पाणी पुरवठयाची बिले महानगरपालिकेने महाराष्ट्र विद्युत मंडळाकडे भरणे बाबत शासन निर्णय क्रमांक एम.आय.एस.-१०९२/प्र.क्र./१२२/नवि-२८/ मंत्रालय मुंबई दिनांक ६ नोव्हेंबर १९९२ रोजी मा.आयुक्त महानगरपालिका यांच्या दालनात पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळा कडील नक्षत्रवाडी ते क्रांतीचौक पर्यंत सर्व पाणी पुरवठा व्यवस्था व विजेचे मिटर महानगरपालिकेने ताब्यात घेण्यासंबंधीची बैठक बोलावण्यात आली होती.या बैठकीस महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाचे अधिकारी व महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते. शासन निर्णयानुसार बैठकीत खालील मुद्दे ठरविण्यात आले.

१) सध्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी होणाऱ्या विज पुरवठयाची बिले एप्रिल १९९३ पासुन पुढे महानगरपालिकेने भरावित.त्यापुर्वी विज कनेक्शन/मिटर महानगरपालिकेचे नावाने हस्तांतरण करण्यात येईल.

२) सध्याचा महानगरपालिकेसाठी असलेला रुपये २-०५ असा पाणी दर महानगरपालिकेने विजेची बिले भरल्यास सामान्यपणे रुपये १-०० येवढा येईल.

३) परिसर अभियांत्रिकी मंडळा कडून सध्याचे विज बिल रुपये ५०=०० लाख भरण्यात येते.यापैकी महानगरपालिकेच्या वाटयास घेतलेल्या पाण्याचे प्रमाणात या बिलाची विभागणी केल्यास ती साधारणतः ८५% म्हणजे रुपये ४२-५० लाख इतकी येईल.थोडक्यात विज बिल रुपये ४२-५० व रुपये १/- दराने पाणी यांचे बिल सामान्यपणे रुपये १७=०० लाख असे एकूण रुपये ५९-५० लाख (रुपये ६०लाख) एवढी देयकी द्यावी लागतील.यामध्ये ५% सुट देण्याचे शासनाचे आदेशात अभिप्रेत आहे.ही सुट लक्षात घेता (६०००-३ (५%) =५७ लाख रुपये देयक द्यावे लागतील.

त्यानुसार महानगरपालिकेला रुपये ५७-०० लाख इतके पाणी व विद्युत बिले यापुढे भरावे लागेल.सध्या महानगरपालिका रुपये ३५-०० लाख इतके पाणी व विज बिल भरत आहे. म्हणजेच यापुढे १ एप्रिल ९३ पासुन रुपये २२-०० लाख इतका दरमहा जास्त खर्चाचा बोजा महानगरपालिकेवर पडणार आहे. थोडक्यात वर्षाला सामान्यपणे २२x१२=२ करोड ६४ लाख इतका अतिरिक्त भार त्यामुळे मनपावर पडणार आहे. ही बाब लक्षात घेवून सन १९९३-९४ च्या अंदाजपत्रकात त्याप्रमाणे तरतुद करावी लागेल.

तरी पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळा कडील नक्षत्रवाडी ते क्रांतीचौक पर्यंत सर्व पाणी पुरवठा व्यवस्था व विजेचे मिटर महानगरपालिकेने ताब्यात घेण्या विषयीचा धोरणात्मक प्रस्ताव मंजुरीस्तव तसेच प्रतिमहा अतिरिक्त वाढणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**अती.शहर अभियंता :** प्रस्तावित शासन निर्णयानुसार महापालिकेने विजेची बिले भरल्यास साधारणपणे रुपये एक एवढा पाण्याचा दर येणार असल्याचा खुलासा मंडळाचे अधिकाऱ्यांनी बैठकीत केला असला तरी याबाबत शंका आहे. हा दर एक रुपया किंवा त्यापेक्षा जास्तही येवू शकतो.जर एक रुपयापेक्षा जास्त दर मंडळास द्यावा लागला तर महापालिकेवर आर्थिक भार पडणार आहे.तेव्हा मंडळास द्यावयाच्या पाणी दराबाबत निश्चित खुलासा केल्या नंतरच याबाबत निर्णय घेण्यात यावा.

**कार्यकारी अभियंता :** शासन निर्णयानुसार मंडळाकडून पाणी पुरवठा होणाऱ्या विद्युत कनेक्शनची बिले भरण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.आणि पाणी दराबाबत मंडळाशी पत्र व्यवहार करण्यात यावा.शासन निर्णयानुसार विजेचे देयके न भरल्यास विद्युत मंडळातर्फे कनेक्शन बंद होण्याची शक्यता आहे.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, शासन निर्णयानुसार मंडळातर्फे औरंगाबाद शहरास होणाऱ्या पाणी पुरवठया बाबतची विद्युत देयके महापालिकने भरल्यानंतर मंडळाकडून निश्चित कोणत्या दराने पाणी पुरवठा करण्यात येईल. याबाबत खुलासा मागविण्यात यावा आणि त्यानंतर यावर निर्णय घेण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी. आजच्या सभेत मंजुर झालेल्या सर्व ठरावांना याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

"यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले."

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | सभापती |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |